नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## नागपूर खंडपीठालाही धमकीचा ईमेल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानंतर नागपूर खंडपीठाला ला धमकीचा मेल आल्याची माहिती समोर आली आहे. नागपूर खंडपीठाच्या ऑफिशियल ई-मेल आयडीवर मद्रास टायगर या नावाने बॉम्बस्फोटाच्या धमकीचा ई-मेल आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

धमकीचा मेल मिळाल्यानंतर तत्काळ सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या घटनेमुळे नागपूर खंडपीठ परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, पोलिसांनी घेतलेल्या तातडीच्या उपाययोजनांमुळे परिस्थिती नियंत्रणात आणली गेली आहे. मद्रास टायगर या नावाने इतर काही शहरांतील उच्च न्यायालयांच्या इमारतींना देखील स्फोटाने उडवून देण्याची धमकी याआधी मिळाली होती.

* वर्ष १६ * अंक २९७ * * भंडारा * बुधवार, दिनांक २३ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख
## खरीखरी..

# हिम्मतबाज निशिकांत

सध्या अनेक बोल घेवड्यांनी सर्व संकेत पायदळी तुडवण्याचे ठरवलेले दिसते. सर्वात वरचे नाव म्हणून झारखंडचे खासदार निशिकांत दुबे यांचा पहिला क्रमांक आहे. निशिकांत दुबे यांचा पहिल्या क्रमांकावर दावा आता मान्य करावाच लागेल. हे निशिकांत दुबे महोदय केवळ संसदेत बोलतात असे नाही. तर त्यांचा संचार 'यत्र तत्र, सर्वत्र' असतो. अशा या महाशयांनी सरळ सरळ सर्वोच्च न्यायालयाच धारेवर धरलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश देशात अशांतता पसरवण्याचे काम करतात. असा अगदी स्पष्ट आणि प्रचंड मोठा आरोप निशिकांत दुबे यांनी केला आहे. संसदेचा एखादा खासदार अशी विधाने करतो. त्याच्याशी आपले काही देणेघेणे नाही असे पक्षाध्यक्ष म्हणतात. अहो तुमचे काही देणे घेणे नसेल. तरी ते खासदार आपल्याच पक्षाचे आहेत. त्यांना अजून तरी पक्षाबाहेर काढलेले नाही किंवा त्यांच्यावर साधी कुठलीच कारवाई केलेली नाही. अशा परिस्थितीत याच निशिकांत दुबे यांनी पुन्हा न्यायालयाला म्हणजेच चक्क सर्वोच्च न्यायालयाला लक्ष्य केलेले आहे. निशिकांत दुबे यांच्यात एवढी हिंमत आली कुठून, हा प्रश्न आता जनता विचारू लागली आहे. कारण त्यांनी पुन्हा न्यायालय लक्ष्य केले आहे. नेहमीच हिंदू-मुस्लिमांची भाषा वापरून या देशाचे भले होणार आहे काय. हे या निशिकांतला विचारणारा पक्षात तरी कोणी आहे की नाही. याचा आता संभ्रम निर्माण झालेला आहे. निशिकांत दुबे यांच्या नंतर त्यांच्याच पक्षातील जे खासदार उपराष्ट्रपती पदावर आरुढ झालेले आहेत. ते धनखड आहेत. ज्यांनी सरळसरळ सर न्यायाधीशांना लक्ष्य करून काही प्रश्न विचारलेले आहेत. ते म्हणतात की, देशात जो कायदा आहे. त्याप्रमाणे संसदच सर्वोच्च आहे. त्याप्रमाणे मान्य करूनही सर्वात महत्त्वाची एक गोष्ट अधोरेखित केली पाहिजे. ती म्हणजे संसदेत जो कायदा पारित केला जातो. तो संविधानाप्रमाणे आहे की नाही हे पडताळून पाहणे सर्वोच्च न्यायालयाचे कामच आहे. हे सुद्धा आताच्या सत्ताधा?यांनीही हे मान्य केले पाहिजे. त्यामुळे जर वक्फचे विधेयक योग्य असेल आणि संविधानाप्रमाणे असेल. तर सर्वोच्च न्यायालय विनाकारण अडथळे आणते, असे म्हणता येईल. पण , याप्रकरणी सध्या तरी सरकारचे सॉलिसिटर जनरल चक्क बॅकफूटवर आहेत. त्यांनी सरन्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी अवधी हवा होता. तो सर न्यायाधीशांनी दिलेला आहे. आता हे सरन्यायाधीश निवृत्त झाल्यावर ही गोष्ट पटलावर यावी. असा प्रयत्न सुरू असल्याचे म्हणतात. एकूणच निशिकांत दुबे यांच्याप्रमाणे अनेक दुबे सध्याच्या कालावधीत दुबेऐवजी चौबे होण्याकरता धडपडत आहेत. दुबे यांची दुबेगिरी त्याच गतीने मागील पानावरून पुढे चालू आहे. हे दुबे महाशय वाचाळ आहेत असे म्हणता येणार नाही. कारण 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे'. असे संत वचन आहे. त्यांनी म्हणजेच दुबे यांनी अजून तरी त्यांच्या वाणी विलासाशिवाय कोणतीही कृती केलेली दिसत नाही. जी गोष्ट उच्चपदस्थ बोलू शकत नाहीत. ते बोलण्याची कामगिरी हे दुबेजी मोठ्या निष्ठेने पार पाडत आहेत. असे राजकीय तज्ञांचे मत आहे. देशातील वातावरण भडकावण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते की, हे दुबेजी करतात. हा मुद्दा मात्र संशोधनाचाच विषय आहे. एकूणच दुबेजींच्या बहादुरीला नमनच केले पाहिजे. कारण अजून त्यांच्याविरुद्ध कोटार्नेही कारवाई करण्याची हिम्मत दाखवलेली नाही. आता पाच मे ला या प्रकरणाची पुन्हा सुनावणी आहे. या सुनावणीत सरन्यायाधीश काही आदेश पारित करतात की, आपले सरकारचे सॉलिसीटर जनरल पुन्हा नवा मुद्दा उकरून नवीन तारीख मागतात. हेच आपल्याला पाहायचे आहे. तोपर्यंत गप्प राहणेच बरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# जम्मू-काश्मिरमध्ये पर्यटकांवर अतिरेकी हल्ला
# २६ जणांचा मृत्यू

### २ परदेशी पर्यटकांचाही समावेश : अतिरेक्यांनी नाव विचारून झाडल्या गोळ्या : पुलवामानंतर सर्वात मोठा हल्ला





■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २२ :
जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी दुपारी ३ वाजता दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये २ परदेशी पर्यटकांचाही समावेश आहे.

सुरुवातीला प्रशासनाने फक्त एका मृत्यूची पुष्टी केली होती, सुमारे ४ तासांनंतर त्यांनी २६ मृत्यू स्वीकारले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दहशतवाद्यांनी प्रथम एका पर्यटकाला त्याचे नाव विचारले, नंतर त्याच्या डोक्यात गोळी झाडली आणि तिथे उपस्थित असलेल्या इतर पर्यटकांवर गोळीबार करत पळून गेले.

लष्कर-ए-तैयबाने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. ही घटना पहलगामच्या बैसरन व्हॅलीमध्ये घडली, ज्यामध्ये २० लोक जखमी झाले. त्यापैकी काही स्थानिक देखील आहेत. फेब्रुवारी २०१९ नंतर काश्मीरमध्ये झालेला हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला असू शकतो. तेव्हा पुलवामा येथे झालेल्या आत्मघाती हल्ल्यात ४७ सीआरपीएफ जवान शहीद झाले होते.

या घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियातून गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवरून चर्चा केल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे.

त्यांनी शाह यांना घटनास्थळी जाण्यास सांगितले आहे. पंतप्रधानांशी बोलल्यानंतर, शाह श्रीनगरला रवाना झाले. येथील अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्याशी बोलून परिस्थितीची माहिती घेतली.

पहलगाममधील हल्ल्याच्या ठिकाणाला सुरक्षा दलांनी वेढा घातला आहे. हेलिकॉप्टरद्वारे परिसरावर लक्ष ठेवले जात आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अनंतनाग पोलिसांनी पर्यटकांसाठी आपत्कालीन मदत कक्ष स्थापन केला आहे. ९५९६७७७६६९ आणि ०१९३२२२५८७० हे दोन हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. याशिवाय, ९४१९०५१९४० हा व्हॉट्सअप क्रमांक जारी करण्यात आला आहे.

**जखमींची नावे**
१. विनो भट्ट, गुजरात, २. एस बालचंद्र, महाराष्ट्र, ३. अभिजवन राव, कर्नाटक ४. संतरू, तामिळनाडू, ५. साहसी कुमारी, ओडिशा, ६. डॉ. परमेश्वर, ७. माणिक पाटील, ८. रिनो पांडे याशिवाय आणखी जखमी आहेत.

### हिंदी अनिवार्य भाषा नाही, शासनाकडून स्थगिती
# अखेर सरकारची माघार!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषेवरून वातावरण तापले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने हिंदी सक्तीला विरोध केला आहे. राज्य शासनाच्या सुकाणू समितीत असलेल्या शिक्षण तज्ज्ञ रमेश पानसे यांनी देखील हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची करणे चुकीचा निर्णय असल्याचे म्हटले आहे.

आता या संदर्भात शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. हिंदी भाषेच्या वापरासाठी आम्ही अनिवार्य हा शब्द वापरला होता. आता या शब्दाला शासन स्थगिती देत आहे. हिंदी भाषा ही बंधनकारक नसेल, असे दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना दादा भुसे म्हणाले, मी स्पष्टपणे नमूद करतो की, हिंदी भाषेच्या संदर्भात केंद्राकडून थपवले जात आहे असे सांगितले जात आहे, असा कुठलाही भाग नाही. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये स्पष्टपणे भाषेच्या संदर्भात पॅराग्राफ आहे. तीन भाषा शिकवण्यासंदर्भात, तीन भाषेचा फॉम्युर्ला तिथे दिला आहे. केंद्राने कोणतीही भाषा राज्यासाठी बंधनकारक केलेली नाही, असे दादा भुसे यांनी म्हटले आहे.

**'अनिवार्य' शब्दाला स्थगिती**

पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले, २०२० चे शैक्षणिक धोरण आहे. ९ सप्टेंबर २०२४ ला तीन भाषांपैकी दोन भाषा आपल्या देशाच्या संबंधित असल्या पाहिजेत, असे सांगण्यात आले आहे.

राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत तिसरी भाषा हिंदी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय झाला होता. तसेच या संदभार्तील शासन निर्णयात हिंदी भाषा 'अनिवार्य' असा उल्लेख झाल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे अनिवार्य या शब्दाला स्थगिती देत आहोत आणि पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.



**१०,५००**
**शिक्षकांची भरती**
सीबीएसईच्या चांगल्या बाबीचा स्वीकार आपल्या अभ्यासक्रमात करणार आहोत. चांगले मुद्दे आपण सीबीएसईकडून घेणार आहोत. व्यापक स्वरूपात इतिहास भूगोल अभ्यासक्रमात दिसेल. तसेच, शिक्षक भरती सुद्धा आपण करत आहोत. १०,५०० शिक्षकांची भरती आपण करत आहोत. पवित्र पोर्टलवरुन ही भरती होणार आहे.

**मराठी विषय बंधनकारकच**

मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी विषय बंधनकारक आहेच. पण, इतर माध्यमाच्या शाळांमध्ये सुद्धा मराठी भाषा विषय बंधनकारक केला गेला आहे. त्या शाळेत मराठी शिकवणारे शिक्षक सुद्धा मराठी भाषेत पदवी मिळवलेले असले पाहिजे याचेही बंधन असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले.

**आनंद गुरुकुल निवासी शाळा सुरू होणार**

शिक्षण विभागाचे ८ विभाग आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी आपण शाळा तयार करणार आहोत. शिक्षकांची इतर अशैक्षणिक काम कशी कमी करता येतील? जीआर काढून कमीत कमी इतर काम शिक्षकांना दिली जातील, असेही भुसे यांनी स्पष्ट केले.

## मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा
### राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मोठा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या व्यवसायाला आता शेतीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे आता मत्स्य व्यवसायाला देखील शेतीप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला.

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या २५ हजार ९७२ कोटी ६९ लाख रुपयांच्या तरतूदीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेवून ३५ हजार रुपयांऐवजी ५० हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

१४ व्या वित्त आयोगामार्फत राज्यात तात्पुरत्या स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या १६ अतिरिक्त व २३ जलदगती न्यायालयांना आणखी २ वर्षे मुदतवाढ देण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. नायगाव ता. खंडाळा जि. सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

## भीषण अपघातात ४ ठार
### पती, पत्नीसह ५ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू









■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २२ :
दुचाकीला बोलेरो वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ४ जण ठार झाले. तुमसर तालुक्यातील पाथरी गावाजवळ हा अपघात सोमवारी रात्री घडला.

एकाच दुचाकीवर चार जण जात असताना विरूद्ध दिशेने येणाऱ्या बोलेरो गाडीने जोरदार धडक दिली. यात तिघांचा घटनास्थळीच तर गंभीर जखमी महिला उपचारादरम्यान दगावली.

चिखला (माईन) येथील कैलाश मरकाम, त्याची पत्नी पार्वता मरकाम, शेजारी राहणारी सुषमा दुर्गाप्रसाद कंगाली आणि तिची पाच वर्षाची मुलगी यामीनी कंगाली हे चौघे एकाच दुचाकीने मध्यप्रदेशातील बोनकट्टा येथे लग्न सोहळ्यासाठी गेले होते. लग्न कार्य आटोपून ते रात्री स्वगावी परत येत असताना रामनगरजवळ ही घटना घडली.

नाकाडोंगरी जवळील चांदमारा येथे मध्यप्रदेशातील हेटी गावाहून आलेल्या वरातीमध्ये छतेरा येथील बोलेरो वाहनाने काहीजण आले होते . चालक दिनेश गौपाले याने लोभी गावाजवळ एका इसमास धडक दिली, ज्यामुळे संबंधित इसमाने जीव वाचविण्यासाठी धाव घेतली. या गोंधळात बोलेरो सुसाट मध्यप्रदेशकडे निघाली.

यातच रामनगरजवळ या वाहनाने समोरून येणाऱ्या दुचाकीला जबर धडक दिली. या घटनेत कैलाश मरकाम (४२), पारबता मरकाम (३६), यामिनी कंगाली (५) व दुर्गा कंगाली (३०) यांचा मृत्यू झाला . बोलेरो चालक आणि त्यातील इसम दारू पिवून होते, अशीही माहिती पुढे येत आहे . गोबरवाही पोलिसांनी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

## फक्त गृहखाते राहिले...



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
मी एक मंत्री आहे, वरिष्ठ मंत्री आहे. महाराष्ट्रात फक्त गृहखाते राहिले, बाकी सर्व खाती झाली, असे विधान भाजप नेते तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

तासगाव येथे शिवनेरी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. पाटील म्हणाले, मी वरिष्ठ मंत्री आहे. महाराष्ट्रात फक्त गृहखाते राहिले, बाकी सर्व खाती झाली आहेत, असे म्हणत चंद्रकांत पाटील यांनी गृहखात्याविषयीची इच्छा बोलून दाखवली आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, मी मंत्री आहे, तरीही माझी अशी धारणा आहे की, आयजीच्या जिवावर बायजी उद्धार असे कशाला हवे. सरकारच्या योजना मी कशाला चालवायच्या. सरकार त्या योजना चालवेल. पण मग मी काय करणार? मी माझ्या खिशात हात घालणार की नाही? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळेच सध्या एकच योजना सांगितली. महिलांनी एकत्र येऊन नव्या-नव्या गोष्टी समोर आणाव्यात.

महिलांना उपयोगी पडणारे उपक्रम मंडळाने करावेत. व्यसनी तरुणाला तुमच्या मंडळाचे सदस्य ठेवू नका. तंबाखू खाणाऱ्यालाही घेऊ नका. आगामी काळात आपली तरुणाई जपली नाही, तर अशीच स्थिती होईल, अशीही भीती पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## युपीएससी सिव्हिल सर्व्हिसमध्ये प्रयागराजची शक्ती दुबे टॉपर
### पुण्याचा अर्चित डोंगरे भारतात तिसरा

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २२ :
यूपीएससीने 2024 च्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला आहे. प्रयागराजची शक्ती दुबे ही ऑल इंडिया टॉपर ठरली आहे.

एकूण 1009 उमेदवारांची नावे गुणवत्ता यादीत समाविष्ट आहेत. गुणवत्ता यादी upsc.gov.in या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील शक्ती दुबे ही ऑल इंडिया टॉपर ठरली आहे. शक्तीने 2016 मध्ये बायोकेमिस्ट्रीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले. हरियाणाची हर्षिता गोयल दुस?या क्रमांकावर तर पुण्याचा अर्चित डोंगरे भारतात तिसरा आहे.



1. शक्ती दुबे
2. हर्षिता गोयल
3. अर्चित पराग डोंगरे
4. मार्गी चिराग शहा
5. आकाश गर्ग
6. कोमल पुनिया
7. आयुषी बन्सल
8. राज कृष्ण झा
9. आदित्य विक्रम
10. मयंक त्रिपाठी

एकूण 1009 उमेदवारांनी यूपीएससी सीएसई उत्तीर्ण केले आहे. यामध्ये, सामान्य वर्गातून 335, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातून 109, ओबीसी वगार्तून 318, अनुसूचित जातीतून 160 आणि अनुसूचित जमातीतून 87 उमेदवार पात्र ठरले आहेत.

यूपीएससी सीएसई प्रिलिम्स परीक्षा 16 जून 2024 रोजी झाली होती, तर मुख्य परीक्षा 20 ते 29 सप्टेंबर 2024 दरम्यान घेण्यात आली होती. तर मुलाखत जानेवारी ते एप्रिल 2025 दरम्यान घेण्यात आली होती. विदर्भातून जयकुमार आडे, श्रीरंग कावरे, राहुल आत्राम, सर्वेश बावणे यांनीही बाजी मारली आहे.

## सोन्याचा भाव १ लाखावर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :
इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमच्या किमतीत ३,३३० रुपयांची वाढ होऊन ती १ लाख रुपयांवर पोहोचली आहे. पूर्वी १० ग्रॅम सोन्याची किंमत ९६,६७० रुपये होती. त्याच वेळी, आज एक किलो चांदीची किंमत ३४२ ने घसरून ९५,९०० प्रति किलो झाली आहे. पूर्वी चांदीची किंमत प्रति किलो ९६,२४२ होती. २८ मार्च रोजी चांदीने १,००,९३४ रुपयांचा उच्चांक गाठला होता.

अमेरिकेच्या टेरिफ धोरणामुळे व्यापार युद्धाचा धोका वाढला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास दर मंदावू शकतो. जागतिक मंदीची भीतीही वाढली आहे. अशा परिस्थितीत लोक सोन्यात गुंतवणूक वाढवत आहेत. मंदीच्या काळात सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानले जाते. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्यामुळे सोन्याच्या किमती वाढल्या आहेत. कारण जेव्हा रुपया कमकुवत होतो तेव्हा तो आयात करण्यासाठी जास्त पैसे लागतात. या वर्षी रुपयाचे मूल्य जवळपास ४% घसरले आहे.



# अखेर संग्राम थोपटे भाजपात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
काँग्रेस पक्षाला भोर विधानसभा मतदारसंघात अखेर मोठे खिंडार पडले. भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी आपल्या समर्थक पदाधिकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. संग्राम थोपटे यांच्याबरोबरच तीन तालुका अध्यक्ष, युवक काँग्रेसचे अध्यक्ष आणि जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांनी देखील आज काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.

अनेक वर्षांपासून आम्ही काँग्रेस रुजवली, वाढवली आणि काँग्रेसचा विचार जनसामान्य जनतेपर्यंत पोहोचला. मात्र माझ्यावर ही वेळ काँग्रेसने आणली असल्याचे संग्राम थोपटे यांनी म्हटले आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भारतीय जनता पक्षातील अनेक नेते आणि कार्यकर्ते मला वारंवार निर्णय घेण्याचे आवाहन करत होते. मात्र मी निर्णय घेऊ शकत नसल्याचे मी त्यांना सांगत होतो. मी एका पक्षाच्या विचाराशी बांधील होतो. मात्र, अखेर त्याच पक्षाने माझ्यावर ही वेळ आणली असल्याचा आरोपही थोपटे यांनी केला आहे.

**काँग्रेसकडून अन्याय**

राजकारणात संघर्ष करायला करावाच लागतो, त्यातून आम्ही कधीच डगमगलो नाही. माझ्या वडिलांना देखील कित्येक वर्षे संघर्ष करावा लागला. मी देखील संघर्ष केला. त्यातून सहकार संस्था असो, स्थानिक स्वराज्य संस्था असो, जिल्हा परिषद असो, पंचायत समिती असो, सर्वच ठिकाणी एक हाती सत्ता मिळवण्याचा आम्ही प्रयत्न केला. काँग्रेसचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिकपणे आम्ही प्रयत्न केला. मात्र काँग्रेसने आमच्यावर वारंवार अन्याय केला. आमच्यावर पक्ष सोडण्याची ही वेळ आणली असल्याचे संग्राम थोपटे यांनी म्हटले आहे.

संग्राम थोपटे हे राजगड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. त्यांचा हा कारखाना अडचणीत असल्याची माहिती आहे. या कारखान्याला राज्य सरकारने ८० कोटींचे मार्जिन लोन मंजूर केले होते.

पण लोकसभेत संग्राम थोपटे यांनी सुप्रिया सुळे यांना मदत केली. त्यामुळे सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला. त्यानंतर अजित पवारांच्या विरोधाने त्यांच्या कारखान्याला जाहीर करण्यात आलेली मदत मागे घेण्यात आली होती. आता या कारखान्याला मदत मिळण्यासाठी संग्राम थोपटे भाजपमध्ये गेली असल्याची चर्चा सुरू आहे.



## मराठी चित्रपटसृष्टी गप्प का?



■ **मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांना हिंदीच्या सक्तीविरोधात गप्प राहण्यावरून सोशल मीडियाद्वारे खडे बोल सुनावले आहेत. राज्य सरकारने शालेय शिक्षणात पहिलीपासून हिंदी अनिवार्य केल्याच्या निर्णयाविरोधात मनसे आक्रमकपणे आंदोलन करत असताना, मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांचे मौन देशपांडे यांनी खेदजनक म्हटले आहे.

देशपांडे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले, चित्रपटगृह मिळाले नाही की राजसाहेबांकडे येणारे मराठी कलाकार हिंदी सक्तीविरोधात का गप्प आहेत? आपण कशाला राजकारणात पडायचे, या कुपमंडूक वृत्तीतून बाहेर पडले नाही तर मराठी उद्योग मरेल आणि भाषाही मरेल. त्यांनी मराठी कलाकारांना मराठी अस्मितेसाठी एकजुटीने पुढे येण्याचे आवाहन केले आहे. हिंदी सक्तीच्या निर्णयाविरोधात मनसेने राज्यभर आंदोलने तीव्र केली असून, मराठी भाषेच्या संरक्षणासाठी ह्यहिंदू आहोत, पण हिंदी नाहीह्ल अशी घोषणाबाजी केली आहे. देशपांडे यांनी मराठी चित्रपटसृष्टीला सांस्कृतिक दायित्वाची आठवण करून दिली आहे. मराठी चित्रपटांनी मराठी संस्कृती जपली पाहिजे. हिंदीच्या सक्तीमुळे मराठी भाषेचे अस्तित्व धोक्यात आहे, असे त्यांनी नमूद केले.

## आयएमए, हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियाचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

■ **मुंबई :** पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) आणि हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडिया यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. डॉ. घैसास यांच्यावर पुढील कारवाई झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे.

तनिषा भिसे यांच्या मृत्यूसाठी डॉ. घैसास यांच्यावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत अलंकार पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम १०६(१) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. ससून रुग्णालयाच्या अहवालात घैसास यांनी उपचारात हलगर्जीपणा केल्याचे नमूद आहे. मात्र, आयएमएचे इंडियन मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांनी हा ठपका अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे. रुग्णाला दाखलच केले नसेल तर हलगर्जीपणाचा आरोप कसा? ससूनचा अहवाल एका दिवसात बदलला कसा? असा सवाल आयएमएने उपस्थित केला.

हॉस्पिटल बोर्ड ऑफ इंडियानेही डॉ. घैसास यांना पाठिंबा देत सरकारच्या कारवाईला विरोध दर्शविला. ह्लडॉक्टरांवरील अन्यायकारक कारवाईमुळे वैद्यकीय क्षेत्राचे मनोबल खचेल,ह्व असे बोर्डाचे म्हणणे आहे. या प्रकरणात पुणे पोलिसांनी डॉ. घैसास यांना नोटीस पाठवून चौकशीसाठी बोलावले आहे. या घटनेमुळे पुण्यात तणाव वाढला असून, रुग्णालय परिसरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. भिसे कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असताना, आयएमए आणि हॉस्पिटल बोर्डाच्या आंदोलनाच्या इशाऱ्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

## उद्धव ठाकरे हे आधुनिक दुर्योधन
### खासदार नरेश म्हस्के यांची टीका



■ **मुंबई :** शिवसेना (शिंदे गट) खासदार आणि प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांना आधुनिक दुर्योधन संबोधत त्यांनी गंभीर आरोप केले. महाभारतात दुर्योधनाने भावांना सुईच्या टोकाइतकीही जागा दिली नाही, त्याचप्रमाणे उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना शिवसेनेतून खड्यासारखे बाजूला केले, अशी टीका म्हस्के यांनी केली.

ठाकरे गटात आता गर्दी जमवणारा नेता राहिला नसल्याने महापालिका निवडणुकीसाठी त्यांना राज ठाकरे यांची गरज भासत असल्याचा टोलाही त्यांनी लगावला. म्हस्के यांनी वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकाला ठाकरे गटाच्या खासदारांनी केलेल्या विरोधावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ह्लवक्फ बोर्डाच्या जमिनींचा उपयोग देशविरोधी कारवायांसाठी होत असताना सुधारणा विधेयकाला विरोध करता? निवडणुकीत मुल्ला-मौलवींकडून मतांचे आवाहन करता? बाळासाहेब ठाकरे यांना हिंदुहृदयसम्राट म्हणायला लाज वाटते, हे तुमचे हिंदुत्व आहे का? अशी विचारणा त्यांनी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे उद्धव ठाकरे आणि संजय राऊत अस्वस्थ आहेत, राऊत यांनी राज ठाकरे यांच्या घराला कॅफेटेरिया म्हटले, हे ठाकरेंच्या परवानगीशिवाय शक्य आहे का? घराची टिंगल करणाऱ्यांसोबत राज ठाकरे जातील का? असा सवाल खासदार नरेश मस्के यांनी उपस्थित केला.

## औरंगाबाद खंडपीठ बॉम्बने उडवण्याची धमकी
### कोर्ट परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २२ :**
मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाला धमकीचा मेल आल्याची माहिती समोर आली आहे. बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली आहे.

हा धमकीचा मेल चेन्नई येथून आल्याचे बोलले जात आहे. याबाबतची माहिती मिळताच औरंगाबाद उच्च न्यायालय परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त करण्यात आला आहे. न्यायालयाच्या सर्व दरवाजांसमोर सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. तसेच हा मेल कोणी पाठवला आहे, याबाबत पोलिस अधिकचा तपास करत आहे.

अधिकची माहिती अशी, आज दुपारी १२ च्या सुमारास हा धमकीचा मेल आला होता. धमकीचा मेल आल्याची माहिती उच्च न्यायालय प्रशासनाने पोलिसांना दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस उपायुक्त प्रशांत स्वामी, सहाय्यक आयुक्त डॉ. रणजीत पाटील, निरीक्षक कृष्णा शिंदे, हायकोर्ट सुरक्षाधिकारी कुंदन जाधव, सायबर पोलीस ठाण्याचे शिवचरण पांढरे तसेच बॉम्बशोधक व नाशक पथकाचे चार पथके, एटीएसचे पथक खंडपीठात दाखल झाले.

न्यायालयाच्या संपूर्ण परिसरात तपासणी सुरू असून, कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नाही. सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत आणि प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. तसेच न्यायालयातील कामकाज देखील नियमित सुरू ठेवण्यात आले आहे. पोलिस यंत्रणा त्यांचे काम करत असून न्यायालयातील कामकाज तसेच ज्यांना न्यायालयात जायचे आहे अशांना देखील उपस्थित राहू दिले जात आहे. सायबर पोलिसांकडून धमकीच्या मेलची चौकशी सुरू आहे. दरम्यान, देशभरातील न्यायालयांना असेच धमकीचे मेल यापूर्वी आले आहेत.

## ..हे तर लँड स्कॅमचे बादशहा
### भाजप नेते तथा मंत्री ॲड. आशिष शेलार यांचा आरोप





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
उद्धव ठाकरे हे मुंबईतील भूखंड घोटाळ्याचे बादशहा आहेत. त्यांच्या डोक्यात सदा न कदा केवळ घोटाळ्यांचेच विचार येतात, असा घणाघात भाजप नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधताना केला आहे.

मुंबईतील गरवारे क्लबमध्ये नुकतीच भाजपची कार्यशाळा पार पडली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, मुंबई मनपा उद्धव ठाकरे यांच्याकडे २५ वर्षे होती. सद्यस्थितीत मुंबईतील एक चौरस फुट क्षेत्रफळाच्या जागेला लाखोंची किंमत आहे. पण ठाकरे यांनी पालिका ताब्यात असताना १ कोटी चौरस फूट क्षेत्र फुकट बिल्डरांच्या घशात घातले. त्यामुळे त्यांना आम्हाला कोणताही जाब विचारण्याचा अधिकार नाही.

द्धव ठाकरे मुंबईतील भूखंड घोटाळ्याचे बादशहा आहेत. त्यांच्या डोक्यात सतत लँड व लँड स्कॅमचे विचार येतात. त्यांनी सध्या काही नवीन बोलणेच सोडून दिले आहे. ते सतत ही जमीन अंबानीला दिली, ती जमीन अदानीला दिली असेच बोलत राहतात.

आशिष शेलार यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांच्याकडून वक्फ कायद्यावर खोटी माहिती पसरवली जात असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, उद्धव ठाकरे वक्फ बोर्ड कायद्याविषयी चुकीची माहिती पसरवत आहेत. तुमची संपत्ती घेणार, मशीद घेणार, स्मशानभूमी घेणारे असे ते म्हणत आहेत. पण या देशात कायदा आहे. त्यामुळे तसे काहीही करता येणार नाही. वक्फ विधेयक हे गरीब मुस्लिमांच्या फायद्यासाठी आहे. नरेंद्र मोदी सरकार वक्फ बोडार्ने घेतलेल्या जमिनी पुन्हा देण्याचे काम करत आहे. आम्ही आयुष्यभर विरोधी पक्षात होतो. पण आम्ही केव्हाच संसदेचे कायदे मानणार नाही असे म्हणालो नाही.

मुस्लिम स्वतः या प्रकरणी पुढे येऊन मोदींचे कौतुक करत आहेत. जे मुस्लिम समाजाल व्होट बँक समजतात तेच लोक याला विरोध करत आहेत. जे लोक नाटक करत आहेत त्यांची एक यादीच आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. त्यांना आम्ही उघडे पाडणार आहोत. कायदा बनला आहे.

आता आम्ही नियम बनवणार आहोत. त्यानंतर गरीब मुस्लिम लोकांना कसा फायदा होणार ते आम्ही पाहू. वक्फ कायदा हे एक क्रांतिकारी यश आहे. आज वातावरण प्रतिकूल आहे असे तुम्हाला वाटेल, पण काळ दाखवून देईल की मोदी बरोबर होते, असेही शेलार यावेळी वक्फ बोर्ड कायद्याचे समर्थन करताना म्हणाले.

## देशाला 'मराठी' शिकण्याची गरज!
### हिंदीच्या मुद्यावरून भाजपला मनसेकडून सणसणीत प्रत्युत्तर





■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :**
हिंदी ही भाजपची भक्ती नव्हे तर सक्ती आहे. अर्धा देश महाराष्ट्रात येऊन स्वतःव पोट भरत असेल तर महाराष्ट्राला हिंदीची नव्हे तर देशाला 'मराठी' भाषा शिकण्याची गरज आहे, अशी बॅनरबाजी मनसेकडून करण्यात आली आहे. हिंदी सक्तीवरून मनसेने भाजपला प्रत्युत्तर दिले आहे.

भाजप आणि शिंदे गटाकडून मनसेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला जाताना दिसून येत होता. पण जसे ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली असताना भाजपकडून राज ठाकरेंना डिवचण्याचा प्रयत्न केला जात आहे.मुंबईमध्ये मनसे आणि भाजपमध्ये बॅनरवॉर सुरू आहे. काल भाजपने राज ठाकरेंच्या घराच्या परिसरात बॅनरबाजी करत मनसेला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. आता याला प्रत्युत्तर म्हणून मनसेकडून बॅनरबाजी करण्यात आली आहे.

अर्धा देश महाराष्ट्रात येऊन स्वतःव पोट भरत असेल तर महाराष्ट्राला हिंदीची नव्हे तर देशाला 'मराठी' भाषा शिकण्याची गरज आहे असे बॅनर लावत मनसेकडून भाजपला प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

## खासदार विशाल पाटील भाजपमध्ये जाणार?
### चंद्रकांत पाटलांनी दिली स्पष्ट ऑफर



■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. २२ :**
माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपचे कमळ हातात घेतल्यामुळे काँग्रेसला जोरदार हादरा बसला आहे. पण आता भाजपने सांगलीचे काँग्रेसच्या विचाराचे अपक्ष खासदार विशाल पाटील यांनाही आपल्या तंबूत घेण्याचे प्रयत्न सुरू केलेत.

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यांना पुन्हा एकदा भाजपत येण्याची ऑफर दिली आहे. विशाल पाटलांनी भाजप यावे असे मी सारखे म्हणत राहणार असल्याचे ते म्हणालेत. चंद्रकांत पाटील यांनी आपल्या सांगली दौ?्यात हे विधान केले आहे.

ते म्हणाले, विशाल पाटील यांनी भाजपमध्ये यावे. पण ते अपक्ष असल्यामुळे ते शक्य नाही. त्यांना त्यासाठी भाजपमध्ये सहभागी व्हावे लागेल. ते तरुण आहेत. हुशार आहेत. त्यांना जनसामान्यांच्या प्रश्नांची चांगली जाण आहे. त्यामुळे असा चांगला माणूस आमच्या पक्षात यावा असे मी सारखे म्हणत राहणार आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे चंद्रकांत पाटील यांनी विशाल पाटील यांना सलग दुस?्यांदा भाजपमध्ये येण्याचे आवाहन केले आहे. गत मार्च महिन्यातही त्यांनी त्यांना भाजप येण्याची ऑफर दिली होती. राजकारणात नेहमी वर्तमानाचा विचार करून चालावे लागते. त्यामुळे विशाल पाटील भाजपसोबत आले तर भाजपचे केंद्रातील संख्याबळ वाढेल आणि सांगलीच्या विकासालाही चालना मिळेल, असे ते म्हणाले होते.

## राकाँ नेते झिशान सिद्दिकी यांना जीवे मारण्याची धमकी
### १० कोटींची मागितली खंडणी



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते झिशान सिद्दिकी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात माहिती मिळताच वांद्रे पोलिस झिशान सिद्दिकी यांच्या निवासस्थानी दाखल झाले आहेत.

बाबा सिद्दिकी यांच्या ईमेल आयडीवरून धमकीचा मेल पाठवण्यात आला आहे. तसेच १० कोटींची खंडणी देखिल मागितली आहे. या पूर्वी देखील झिशान सिद्दिकी यांना जीवे मारण्याची धमकी आली होती. त्यामुळे आता सिद्दिकी कुटुंबीयांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

बाबा सिद्दिकी यांची ज्या प्रकारे हत्या करण्यात आली त्या प्रकारे तुझी हत्या करण्यात येईल, असा धमकीचा मेल झिशान सिद्दिकी यांना पाठवण्यात आला आहे. झिशान सिद्दिकी यांनी याबाबत मुंबई पोलिसांना माहिती दिली आहे. जे हाल तुज्या वडिलांचे केले तेच तुझे करू असा उल्लेख मेलमध्ये करण्यात आला आहे. तसेच यात डी गॅंगचा उल्लेखही करण्यात आला आहे.

झिशान सिद्दिकी यांना गेल्या २ दिवसांपासून धमकीचे मेल येत असल्याची माहिती आहे. या मेलमध्ये १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली आहे. रिमायंडर साठी प्रत्येकी ६ तासांनंतर मेल करणार असल्याचा उल्लेख आहे. दरम्यान, झिशान सिद्दिकी यांचे वडील बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. विशेष बाब म्हणजे गेल्या २ दोन दिवसांपासून झिशान सिद्दिकींना धमकीचे मेल येत आहेत. सध्या वांद्रे पोलिस झिशान सिद्दिकी यांच्या घरी दाखल झाले असून त्यांच्याकडून जबाब नोंदवणे सुरु आहे.

झिशान सिद्दिकी यांना यापूर्वी देखील धमकी देण्यात आली होती. बाबा सिद्दिकी यांच्यावर दसऱ्याच्या दिवशी गोळीबार करण्यात आला होता. त्या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे. हे सुरु असतानाच झिशान सिद्दिकी यांना पुन्हा एकदा धमकी आल्याने खळबळ उडाली आहे.

## मनालीचा मृत्यू संशयास्पद
### अंजली दमानिया यांनी व्यक्त केला संशय
### धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढणार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले राजेंद्र घनवट यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले होते. त्यांनी धनंजय मुंडे यांना हाताशी धरून शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या असल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

मात्र, आता या दरम्यान त्यांच्या पत्नी मनाली राजेंद्र घनवट यांचे निधन झाले आहे. मात्र त्यांचे निधन हे नैसर्गिक नसून त्यांनी आत्महत्या केली असल्याचा संशय ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंजली दमानिया यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा धनंजय मुंडे आणखी एका वादात सापडणार का? अशी शक्यता वर्तवली जात आहे.

या संदर्भात मनाली घनवट यांच्या नातेवाईकांनीच संशय व्यक्त केला असल्याचा दावा दमानिया यांनी केला आहे. एका पोस्टच्या माध्यमातून त्यांनी या बाबत माहिती दिली. या संदर्भात आता ससून रुग्णालयाच्या रिपोर्ट मधून आता या संदर्भात सत्य माहिती समोर येईल, अशी आशा आपण ठेवू शकतो, असे देखील दमानिया यांनी म्हटले आहे. कारण ससूनचे रिपोर्ट किती गंभीर आहेत? हे सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे या संदर्भात केवळ सत्य समोर येईल एवढी आशाच आपण ठेवू शकतो, असे देखील अंजली दमानिया यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितला आहे.

अंजली दमानिया यांनी केले आरोप

या संदर्भात अंजली दमानिया यांनी अतिषय गंभीर आरोप केले आहेत. यामध्ये त्या म्हणाल्या की, 'खूप खूप धक्कादायक ! राज घनवट, जे धनंजय मुंडे यांच्या अतिशय जवळचे आहेत, त्यांच्या पत्नीच्या आकस्मित मृत्यू झाला आहे. कारण स्पष्ट नाही.

पुण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात त्यांना नेण्यात आले होते. राज घनवट धनंजय मुंडे त्यांच्या कंपन्यात डायरेक्टर आहेत, ह्याच राज घनवट ने शेतक?्यांच्या जमिनी लाटल्या आहेत, व याच जमिनीच्या चौकशीची मागणी, मी महसूल मंत्री बावणकुळे यांच्या कडे केली होती. ही आत्महत्या आहे असे त्यांच्या जवळच्या लोकांचे म्हणणे पण तो नैसर्गिक मृत्यू आहे असे दाखवण्याचा प्रयत्न होत आहे.'

## जमिनीच्या वादातून तरुणाचा खून

**चार आरोपींना सोलापुरातून अटक**

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २२ :**
कात्रज येथील जमिनीच्या आर्थिक वादातून कात्रज भागातील ओमसाई मित्रमंडळ शेजारी साईछत्र अपार्टमेंटच्या पाठीमागील बाजूस मोकळ्या जागेत एका तरुणाचा निघृण खून केलेला मृतदेह पोलीसांना मिळून आला होता.

शुभम सुभाष चव्हाण असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलीसांनी तांत्रिक विश्लेषण आधारे आरोपींचा माग काढून सोलापूर जिल्हयातील मोहोळ भागात कामती खु. येथे पोलीस पथक जाऊन त्यांनी चार आरोपींना अटक केली.

अमर दिलीप साकोरे (४०), मंदार मारुती किवळे (३५), गिरीश सुभाष बाबरे (२६) व योगेश बाबुराव डोरे (३५, सर्व रा.कात्रज,पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगार आरोपींची नावे आहे. पोलिसांचे पथक सोलापूरला गेल्यानंतर, त्यांनी तांत्रिक विश्लेषण आधारे आरोपींचा ठावठिकाणा काढला. गुन्ह्यातील आरोपी हे मंगळवेढा ते सोलापूर रस्त्यावर मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी खुन केल्याची कबुली दिली आहे.

## जनता अडचणीत... सरकार भोगते आहे पंचतारांकित सुविधा
### हर्षवर्धन सपकाळांचे टीकास्त्र





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
हे सरकार जनतेला आर्थिक अडचणीत टाकून स्वतः पंचतारांकित सुविधा भोगत आहेत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अहिल्यानगरच्या चौंडीमधील मंत्रिमंडळ बैठकीवरील खर्चावरुन केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्य आर्थिक अडचणीत असल्याचं सांगत सरकारने ज्येष्ठ नागरिक तीर्थक्षेत्र योजना बंद केली. लाडक्या बहिणींना प्रति महिना २१०० रुपये दिले नाहीत. शेतकरी कर्जमाफी केली नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी ट्विट करत म्हटलंय की, राज्य आर्थिक अडचणीत असल्याचे सांगत सरकारने ज्येष्ठ नागरिक तीर्थक्षेत्र योजना बंद केली. लाडक्या बहिणींना प्रति महिना २१०० रुपये दिले नाहीत. शेतकरी कर्जमाफी केली नाही आणि चोंडी येथे मंत्रिमंडळ बैठकीच्या मंडप आणि व्यवस्थेसाठी १५० कोटी रुपयांची उधळपट्टी केली जात आहे.

एक आठवड्यापूर्वी खा. सुनिल तटकरेंच्या घरी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह गेले होते त्यावेळीही हेलिपॅडसाठी दीड कोटी रुपये खर्च केले होते. जनतेला आर्थिक अडचणीत टाकून सरकारमध्ये बसलेले सत्तासुर पंचतारांकित सुविधा भोगत आहेत.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुंबईवरील दहशतवादी २६/११ च्या हल्ल्या प्रकरणी भाजप प्रवक्ते माधव भंडारी यांनी केलेल्या वक्तव्याचा आम्ही त्याचा निषेध करतो. या प्रकरणातला आरोपी डेव्हिड कोलमन हेडली अद्याप फरार आहे. तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण करून त्याला मुंबईत आणले आहे. माधव भंडारींना ताब्यात घेऊन त्यांचीही राणासोबत चौकशी करावी.

**सपकाळ अजून खूप लहान**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सपकाळ अजून खूप लहान आहेत, मोठा पल्ला त्यांना गाठावा लागेल, पण त्यासाठी आधी पोरकटपणा सोडून द्यावा लागेल. सपकाळ माध्यमांत झळकत राहण्यासाठी असा पोरकटपणा करतात तेव्हा त्यांची कीव येते, अशा शब्दात महसुल मंत्री बावनकुळे यांनी टोला लगावला.

त्यांनी केलेले वक्तव्य गंभीर आहे. त्यांच्या वक्तव्यानुसार त्यावेळी सरकारमध्ये असलेले अनेक नेते आज भाजपामध्ये आहेत. अजित पवारांसह अनेकजण त्यावेळीही मंत्रिमंडळात होते, आताही मंत्रिमंडळात आहेत. अजित पवारांना मंत्रीपदावरून बरखास्त करून त्यांचीही चौकशी करावी.

## अतिक्रमण हटाव मोहिमेचा मुहूर्त निघाला

**नवेगावबांध** : नवेगवाबांध येथील मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजुला व्यापाऱ्यांनी तसेच काही लोकांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे रस्ता अरुंद होत चालला आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे नवेगावबांध येथील रस्त्यांचा श्वासही गुदमरत आहे. दरम्यान रहदारीला मोठा त्रास होत आहे. यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून अतिक्रमण स्वतःहून काढण्याचा नोटिस बजावण्यात आले होते. मात्र काही अतिक्रमण धारकांनी पुढाकार घेत अतिक्रमण काढले तर अनेकांचे अतिक्रमण काय आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने येत्या मंगळवारी अतिक्रमण हटाव मोहिमेचा निर्णय घेतला आहे. नवेगावबांध येथील मुख्य रस्त्यांच्या दोन्ही बाजूला नागरिकांनी टिनाचे शेड, पायरीचे बांधकाम, दुकानाचे बॅनर, नालीवर ठेवलेले लाकडी ठेले, फलक, नालीचे बाहेर काढले आहे. एवढेच नव्हेतर दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत चालल्याने गावातील सर्वच प्रमुख रस्ते अरुंद होत चालले आहे. रहदारीला त्रास होत आहे. यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने अतिक्रमण धारकांना स्वतःहून अतिक्रमण काढून घेण्याची विनंती केली. दरम्यान काहींनी अतिक्रमण काढले तर अनेकांचे अतिक्रमण क ायमच राहिले आहे. उलट अतिक्रमण धारकांकडून मुरजोरपणाचा परिचय दिला जात आहे. या प्रकारामुळे नवेगावबांध वासीयांकडून ग्रामपंचायत प्रशासनाविरुद्ध चांगलाच संताप व्यक्त केला जात आहे. या गंभीर बाबीची दखल घेत ग्रामपंचायत प्रशासनाने १६ एप्रिल रोजी पुन्हा अतिक्रमण धारकांना नोटीस बजावून अतिक्रमण काढण्याच्या सुचना केल्या आहेत.

## दृष्टिक्षेप

### अवैद्य रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

**तिरोडा** : निलागोंदी परिसरात अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर तहसीलदार समशेर पठाण यांनी कारवाई करून ट्रॅक्टर व रेती जप्त केला. २१ एप्रिल रोजी तहसीलदार समशेर पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाचे भरारी पथक गस्त घालत असताना ग्राम निलागोंदी येथे विना क्रमांकाचा ट्रॅक्टर एक ब्रास अवैद्य रेती वाहतूक करतानी सापडला. सदर ट्रॅक्टर वर कायदेशीर कारवाई व पंचनामा करून ट्रॅक्टर पोलीस स्टेशन दवनीवाडा येथे जमा करण्यात आले. ही कार्यवाही मंडळ अधिकारी जी.व्ही. गाढवे, महसूल अधिकारी अनुप नंदेश्वर, एम.एस.गेडाम, बाळासाहेब साखरे, मनीष तिवारी यांनी केली.

### लोखंडी साहित्याने मारून केले जखमी

**गोंदिया** : तिरोडा पोलिस ठाण्यांतर्गत सतोना येथे लोखंडी साहित्याने मारून जखमी केल्याची घटना १९ एप्रिलची आहे. फियार्दी कार्तिक शेंडे व आरोपी नरेश चौधरी दोन्ही रा. सतोना हे मोहल्ल्यात एका लग्न कार्यक्रमात गेले असता, त्या दोघांमध्ये वाद निर्माण झाला. दरम्यान फियार्दीचा मुलगा हा वाद सोडविण्यासाठी गेला असता, आरोपीने लोखंडी साहित्याने मारून जखमी केले. तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### स्व. श्रीराम वंजारी यांच्या प्रतिमेचे अनावरण आज

**तिरोडा** : तालुक्यातील गांगला येथील ज्येष्ठ समाजसेवक व माजी सरपंच, दानसूर नेतृत्व स्वर्गीय श्रीराम सोमाजी वंजारी यांची पाचवी पुण्यतिथी व त्यांच्या कायार्ची दखल घेवून त्यांच्या प्रतिमेचे लोकार्पण २३ एप्रिल शिवालय परिसर गांगला येथे करण्यात येणार आहे. प्रतिमेचे लोकार्पण माजी आमदार दिलीप बन्सोड यांचे हस्ते प्राचार्य तथा महाराष्ट्र प्रांतिक तेली समाज जिल्हा गोंदियाचे कार्याध्यक्ष डी आर गिरीपुंजे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे. यावेळी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक योगेश पारधी, ज्येष्ठ समाजसेवक सुरेश धुर्वे, दुलीचंदराव बुद्धे, युवराज कुंभलकर, सोनाली बुद्धे, बंडू हटवार, गोपाल वंजारी, जागृती लोहिया, अशोक बोपचे, प्रमिला ऊके, आशा सार्वे, एडवोकेट लखनसिंह कटरे, प्रेमलाल रहांगडाले, रामसागर धावडे, संजय किंदरले ,छाया कुंभलकर, सुभाष वडीचार, राजू नंदेश्वर, देवेंद्र कुंभलकर, पद्मा टेंभेकर, निशा ठवकर, बलराम साठवणे, सरपंच संजय बुद्धे, दानवीर नंदेश्वर आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन शिवालय समितीचे चंदन वंजारी, हितेश वंजारी तसेच गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. तरी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवालय समिती गांगला यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### दगडाने मारून केले जखमी

**गोंदिया** : गंगाझरी पोलिस ठाण्यांतर्गत एकोडी येथे लग्न सराईच्या कार्यक्रमात दगडाने मारून जखमी केल्याची घटना १९ एप्रिल रोजीची आहे. फिर्यादी रंजीत रोमराज बिसेन रा. एकोडी हा गावातील लग्न कार्यात गेला असता, जेवन सुरू असतांना आरोपी दिपक पारधी रा. सेजगावकला याने फिर्यादी सोबत वाद निर्माण केला. तसेच दगडाने मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पो.हवा. निलकंठ रस्के करीत आहेत.

# यंदा जिल्ह्यात होणार ७८ लाख मनुष्यदिवस काम

## मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांची माहिती
## पदभार सांभाळताच सर्वात आधी गाठला गोंदिया

**प्रतिनिधी / गोंदिया**

मागेल त्याला शंभर दिवस काम देण्याची हमी देणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना लोकांच्या हाताला काम देऊन मजुरांचे स्थलांतरण थांबविते. गोंदिया जिल्ह्यात ४ लाख ३२ हजार ॲक्टीव्ह मजूर असून सन २०२५-२६ या आर्थीक वर्षात गोंदिया जिल्ह्यातील मजुरांना ७८ लाख मनुष्यदिवस काम देण्यास आम्ही तत्पर असल्याची ग्वाही मनरेगाचे आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली आहे. त्यांनी मनरेगा आयुक्तांचा कारभार घेताच जिल्ह्यांचा दौरा करण्याचा विचार



येताच त्यांनी सर्वात आधी गोंदिया जिल्हा गाठला. २१ एप्रिल रोजी त्यांनी गोंदिया जिल्ह्यात सुरू असलेल्या मनरेगाच्या कामावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

गोंदिया तालुक्याच्या आसोली येथे मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड हे काम पाहण्यासाठी गेले असतांना एकाच गावात तीन कामे सुरू होती. महिला भवन, सिमेंट रस्ता व पाझर तलावाचा गाळ काढण्याचे काम सुरू होते. त्यांनी मजुरांशी संवाद साधला. त्यानंतर अर्जुनी येथेही जाऊन त्यांनी मनरेगाच्या कामाची पाहणी केली. महाराष्ट्र मनरेगाची ११ लाख कामे अपूर्ण आहेत.त्यातील ५ ते ६ लाख कामे यंदा पूर्ण केली जाणार आहेत. ३३०० कोटी कुशल कामाचे तयर १३०० कोटी अकुशल कामाचे केंद्राकडून येणे बाकी आहे. तो निधी आल्यास त्वरीत तो वितरीत करण्यात येईल.

मागच्या वर्षात गोंदिया जिल्ह्याने मनरेगाचे ११६ टक्के काम केले आहे. मागेल त्या प्रत्येकाला काम देण्यास आम्ही तत्पर असल्याचे आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले आहे. या दौऱ्यात जिल्हाधिकारी प्रजित नायर, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहरे, अप्पर उपायुक्त सुधीर मोहरीर, मनरेगा उपमुख्य कार्यकारी अधिकारी लोहबरे, गोंदियाचे गटविकास अधिकारी आनंद पिंगळे होते.

# आंघोळीसाठी गेलेल्या मुलाचा कालव्यात बुडून मृत्यू

**प्रतिनिधी / गोंदिया**

गोरेगाव शहराला लागून असलेल्या हलबीटोला येथील कटंगी मध्यम प्रकल्पाच्या कालव्यावर मित्रांसह आंघोळीसाठी गेलेल्या एका १५ वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना आज, मंगळवार २२ एप्रिल रोजी पहाटे ३ वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

अंश दिलीप बारेवार रा. हिरडामाली ता. गोरेगाव असे मृताचे नाव आहे. हलबीटोला येथील स्मशानभूमी परसिरातून कटंगी मध्यम प्रकल्पाचा कालवा देण्यात आला असून सद्या उन्हाळी हंगाम असल्याने कालव्यात पाणी अडविण्यात आले आहे. दरम्यान, काल, २१ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास मृत अंश बारेवार हा आपल्या चार ते पाच मित्रांसह त्या कालव्यावर आंघोळीसाठी गेला होता. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला. रात्रीपर्यंत अंश घरी न आल्याने कुटूंबीयांनी २१ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास गोरेगाव पोलिसात तो बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी तपासाला सुरुवात करत त्याच्या सोबत असलेल्या मित्रांना विचारपूस केली असता मंगळवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास सदर प्रकार पुढे आला. दरम्यान, स्थानिकांच्या मदतीने सकाळी ९ ते १० वाजताच्या सुमारास अंशचे मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. याप्रकरणी गोरेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमांची मेजवानी

**प्रतिनिधी / गोंदिया**



तालुक्यातील मुंडीपार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान १९ एप्रिल रोजी रॅली व संगितम तथागत गौतम बुद्ध व भीम गितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी खासदा प्रशांत पडोळे, दिलीप बन्सोड, जि.प.सभापती दीपा चंद्रिकापुरे, नितीन टेंभरे, गेडाम, रामटेके, उपसरपंच प्रमोद पटले, पो.पा. आनंद साउंस्कार, ग्रा.पं.सदस्य रविशंकर खोटेले, कपील नेवारे, मनोज बिजेपार, नितीन बन्सोड, प्रवीण बिजेवार, अजय डोंगरे, पुरुषोत्तम ठवरे, नरेंद्र गणवीर, अनिल डोंगरे, नरेश डोंगरे, रविशंकर ठवरे, दिवाकर देशभ्रतार, महेंद्र ठवरे, सुरेंद्र गणवीर, आदित्य गणवीर, अल्पेश डोंगरे, सोनू नरनावरे, तेजूभाऊ कोहडे, मन्नूभाऊ मांडीये, छोटूभाऊ मौदेकर, दुर्गेश किरणापुरे,सौरव बिजेवार, निलेश मेंढे, अजय आसोले, गोल्डी बारवार, लकी बिजेवार, अरमान चेचाने, नवीन डोंगरे, संतोष डोंगरे,प्रतीक ठवरे, जितु ठवरे, शैलेश बन्सो आदी उपस्थित होते.

# मत्स्यव्यवसायाला आता कृषी क्षेत्रासारखा दर्जा

## आमदार डॉ. परिणय फुके यांच्या पाठपुराव्याला यश



**प्रतिनिधी / गोंदिया**

राज्यातील मत्स्यव्यवसायाला आता कृषी क्षेत्राचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या लाखो कुटुंबांना शासकीय सवलतींचा लाभ मिळणार असून, हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे.

शेतीप्रमाणेच आता मत्स्यव्यवसायिकांनाही नुकसान भरपाईचा मार्ग खुला झाला आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मच्छीमार बांधव आहेत. त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आमदार डॉ. परिणय फुके यांनी राज्य सरकारकडे वेळोवेळी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत आज मंत्रिमंडळाने हा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयामुळे मच्छीमारांना शेतीप्रमाणे वीज दरात सवलत, कृषी दरानुसार कर्ज, अल्प दरातील विमा, किसान क्रेडिट कार्ड सुविधा तसेच सौर उर्जेच्या योजनांचा लाभ मिळणार आहे. मत्स्यव्यवसायिकांना आता शासकीय योजनांचा अधिक लाभ घेता येणार असून, त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल, असे आमदार डॉ. फुके यांनी सांगितले.

या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानण्यात आले आहेत. त्यांनीही या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला.

### सिंचन प्रकल्पालाही गती

**याच मंत्रिमंडळ बैठकीत गोसी खुर्द प्रकल्पासंदर्भातील सुधारित प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. एकूण २५,९७२ कोटी रुपयांच्या सुधारीत प्रशासकीय मंजुरीला आज मान्यता मिळाली असून, यामुळे भंडारा, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यातील सुमारे १,९७,००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या निर्णयाचेही आमदार डॉ. परिणय फुके यांनी स्वागत केले आहे.**

# वाय.टी.कटरे यांच्यासह ६३ कार्यकर्त्यांचा काँग्रेस प्रवेश

**प्रतिनिधी / तिरोडा**

भारताचा तसाच महाराष्ट्राचा विकास हा काँग्रेस पक्षच घडवू शकतो यावर तसेच नानाभाऊ पटोले व स्थानिक माजी आमदार दिलीप बन्सोड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती वाय टी कटरे यांनी आपल्या ६३ समर्थकांसह तिरोडा येथील काँग्रेस भवन येथील आयोजित कार्यक्रमात काँग्रेस पक्ष्यात प्रवेश घेतला.

यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार प्रशांत पडोळे, माजी आमदार तथा गोंदिया जिल्हा अध्यक्ष दिलीप बन्सोड, काँग्रेस नेते राधेलाल पटले व काँग्रेसचे तालुका व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. यांच्या उपस्थितीत वाय टी कटरे यांच्या काँग्रेस पक्षात प्रवेश झाल्याने तालुक्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य तसेच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे . वाय टी कटरे यांचे सोबत तुंडीलाल शरणागत, वनिता ठाकरे, सुनिता किशोर खंडाते, साधनाताई डोंगरे, सुनीता मेश्राम, अशोक बिसेन राजू भलावी, विजय वाघाडे, कमलेश मारबते, आशिष वाघाडे, किशोर खंडाते, शेखर खंडाते, निकलेज खंडाते, शिवा उईके, सुरेश खंडाते, सुनील परतेती, रवी राऊत, शत्रुघ्न बोबडे, मुकेश खंडाते, सुखराम खंडाते, प्रेमलाल राऊत, मनीषा राऊत, सोनू राऊत, भूमिका मंडारी, सत्यकला कोबडे, कविता परतेती, शारदा खंडाते, जसवंत खंडाते, सुरेखा राऊत, मीरा राऊत, सिंधू परतेती, शालू परतेती, लता कोबडे, आकाश कुसराम, प्रदीप चामलाटे, विनोद चामलाटे, अनिल राऊत, कन्हैया चामलाटे लघुमन कोंबाडे सत्यवान राऊत, संदीप चामलाटे, हिरामण टेंभरे, लोकचंद टेंभरे, दुर्गा नेवारे, रूपलाल टेंभरे, सुरेंद्र ठाकरे, हनीफ शेख, निलेश्वर टेंभरे, आचल चंद्रिकापुरे, चंद्रप्रकाश सोयाम, शर्मिला चंद्रिकापुरे, अरुणा सोयाबीन, शबाना शेख भरत कोबडे यांच्या समावेश आहे.


## जाहिर सुचना

**संस्थेचे नाव** :- ताराम आदिवासी शिक्षण संस्था देवरी द्वारा संचालीत

**शाळेचे नाव** :- स्व. चंद्रकला ताराम आदिवासी आश्रमशाळा शेरपार देवरी जि.गोंदिया

या आश्रमशाळेत स्पयंपाकी पदावर कार्यरत श्री सुरेश धर्मा बोरकर हे दिनांक :- ०७/०७/२०२३ पासून शाळेत व वस्तीगृहात कोणत्याही प्रकारची पूर्व परवानगी आणि अर्ज न देता सतत गैरहजर आहेत.

तरी ही जाहिरात प्रकाशित होताच आपण १५ दिवसाच्या आत आश्रमशाळेत रुजू व्हावे अन्यथा आपल्या विरुध्द सेवा मुक्तीची कारवाई केली जाईल.

आदेशान्वये
अध्यक्ष/सचिव
ताराम आदिवासी शिक्षण
संस्था देवरी जि.गोंदिया

## ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार
## पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा परीषद गोंदिया

**निविदा सुचना- ०१/२०२५-२६** दि. २१/०४/२०२५

ग्रामपंचायत कार्यालय पिंडकेपार पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परीषद गोंदिया हे १५ वा वित्त आयोग अंतर्गत ग्रा.प. पिंडकेपार येथे विविध बांधकामे/ दुरुस्तीची कामे करणे जि.प बांधकाम विभाग गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी पध्दतीने ऑफलाईन मागवित आहे.

**ई-निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्दी व दाखल दिनांक | दिनांक २१/०४/२०२५ पासुन |
| २ | निविदा अंतिम दिनांक | दिनांक २६/०४/२०२५ला. ०५.०० वा. पर्यंत |
| ३ | निविदा उघण्याची दिनांक | दिनांक २८/०४/२०२५ला<br>१२.०० वा. शक्य झाल्यास |

विस्तृत माहीती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वाना लागु राहतील.

सरपंच
ग्रा.पं. कार्यालय पिंडकेपार

ग्रामसेवक
ग्रा.पं. कार्यालय पिंडकेपार

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
### (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा, तह. तिरोडा, जि. गोंदिया.
ई मेल: eelipd_tirora@yahoo.in दुरध्वनी क्र. २५३४१६
ई-निविदा सुचना क्र. १०/२०२४-२५ (दुसरी वेळ)
**Main Portal: https://mahatenders.gov.in**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा तह. तिरोडा जि. गोंदीया, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता सक्षम असलेल्या कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा तह. तिरोडा जि. गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | बयाना रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम | पात्रता | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुराटोला लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या उजव्या डाव्या शिर्ष विमोचकाचे दुरूस्तीचे काम. शिर्ष विमोचकाच्या U/S व D/S बाजुला Staircase चे तसेच Parapet wall चे बांधकाम | रु २१.७७ लक्ष | रु. २२,०००/- | रु.२,०००/- जीएसटी १८% Rs.३६०/-= रु.२,३६०/- | ब-वर्ग मजुर सहकारी संस्था फक्त गोंदिया जिल्हा | ०६ महिने (पावसाळा कालावधी धरुन) |

| | |
|---|---|
| अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. २८/०४/२०२५ सकाळी ११:०० ते ०५/०५/२०२५ वेळ १७.४५ वाजता पर्यंत |
| ब) ई-निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी | दि. ०५/०५/२०२५ वेळ १७.४५ वाजता पर्यत |
| क) निविदा पूर्व बैठक | लागु नाही |
| ड) निविदा उघडणे (तांत्रिक लिफाफा) | दिनांक ०६/०५/२०२५ (वेळ सकाळी १२.३० वाजता) |

सदर निविदे सुचनेत काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल
१) सदर कामाकरीता पश्चात अर्हता (Post qualification) पध्दत लागू नाही.
२) कार्यकारी अभियंता कार्यालयातुन ई-निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
३) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्रशासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डवर पहावयास मिळेल.
४) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे इ. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.

जावक क्र. / ६७४/निली/२०२५ दि. १५/०४/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उपसा सिंचन प्रकल्प विभाग,
तिरोडा

अ.प्र. कापसे
कार्यकारी अभियंता उपसा
सिंचन प्रकल्प विभाग,
तिरोडा

जिमाका/गों/जाहि/०६/२०२५

# भिंतीमधूनही वीज निर्मिती

देशात मशिदीखाली मंदीर आहे का? याचा शोध घेण्यात भारतातील एक मोठा वर्ग व्यस्त असताना, विदेशात मात्र नवनवीन शोध लावले जात आहेत. विजेची मर्यादित निर्मिती आणि मोठी मागणी ही जगभरात बिकट समस्या आहे. अशा परिस्थितीत विजेचे आणखी काही स्त्रोत शोधता येतील का? या दिशेने अनेक प्रगतीशिल देश काम करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आता व्यक्तीच्या चालण्यातून आणि इमारतीच्या भिंतीतूनही विजेची निर्मिती करता येवू शकणार आहे.

-------------------

पृथ्वी जागतिक तापमानवाढीला तोंड देत आहे आणि जगाच्या वाढत्या लोकसंख्येसह, ऊर्जेची मागणी देखील सतत वाढत आहे. पर्यावरणवाद्यांचा असा विश्वास आहे की पृथ्वी वाचवण्यासाठी ऊर्जेचा वापर कमी करणे आवश्यक आहे आणि जागतिक लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता हे जवळजवळ अशक्य आहे. पण कल्पना करा की तुमच्या दैनंदिन कामांमधून ऊर्जा निर्माण होऊ लागली तर? याचा अर्थ असा की, जेव्हा तुम्ही तुमच्या घराबाहेर पायी चालता तेव्हा वीज निर्माण होते, तुमच्या शहराचा आवाज उर्जेत रूपांतरित होतो आणि तुमच्या घराच्या भिंती देखील ऊर्जा निर्माण करू शकतात.

**शहराच्या आवाजापासून वीज निर्मिती**

न्यूयॉर्क शहरात सरासरी ७० डेसिबल इतका सतत आवाजाची पातळी असते. जणू काही कोणीतरी तुमच्या कानाजवळ मिक्सर वाजवत आहे. शहरांच्या या ध्वनी प्रदूषणापासून वीज निर्मिती करण्याची तयारी आता शास्त्रज्ञ करत आहेत.

यासाठी पायझोइलेक्ट्रिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. म्हणजेच, असे पदार्थ जे दाब दिल्यावर वीज निर्माण करू शकतात. जसे की क्वाट्‌र्ज क्रिस्टल्स आणि पॉलिव्हिनिलिडीन फ्लोराइडसारखे लवचिक पॉलिमर. ध्वनी-कॅप्चर उपकरण १०० डेसिबलच्या आवाजापासून १०-५० मायक्रोवॅट/सेमी² पॉवर निर्माण करू शकते.


ऑस्ट्रेलियातील डीकिन विद्यापीठातील संशोधक हाओ शाओ आणि टोंग लिन यांनी एक इलेक्ट्रोस्पन पॉलीएक्रिलोनिट्राइल नॅनोफायबर पडदा तयार केला आहे जो कमी-मध्यम वारंवारता (१००-५०० हर्ट्झ) आवाजाचे विजेमध्ये रूपांतर करू शकतो.

२०१९ मध्ये, फिलीपीन सायन्स हायस्कूल-वेस्टर्न विसायास कॅम्पसमधील ११ वीच्या पाच विद्यार्थ्यांनी एस-लाइट नावाचे उपकरण तयार केले. आवाजाचे विजेमध्ये रूपांतर करून, पॉवर बँक सारखी उपकरणे चार्ज करता येतात. ऑक्टोबर २०१९ मध्ये मलेशियामध्ये झालेल्या यंग इन्व्हेंटर्स चॅलेंजमध्ये या नवोपक्रमाला रौप्य पुरस्कार मिळाला.

ध्वनी प्रदूषणाचे विजेमध्ये रूपांतर करण्याचे तंत्रज्ञान अद्याप प्रायोगिक टप्प्यात आहे. सध्या ते एलईडी दिवे, सेन्सर किंवा लहान उपकरणांसाठी वीज निर्माण करू शकते. परंतु मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती करणे कठीण आहे.

**शहरांमधील गर्दी विजेचा स्त्रोत**

कल्पना करा की तुम्ही चालत आहात आणि तुमच्या प्रत्येक पावलाने वीज निर्माण होत आहे. यासाठी, काही शास्त्रज्ञांनी स्मार्ट टाइल्स तयार केल्या, ज्या पायझोइलेक्ट्रिक तंत्रज्ञानावर काम करतात आणि पायाच्या दाबाने वीज निर्माण करतात.




यूकेमधील पेवेगेन कंपनीने प्रथम लंडनच्या हीथ्रो विमानतळावर स्मार्ट टाइल्स बसवल्या. टाइल्सची रचना आणि मजबुती अशी आहे की त्या १० लाख पावलापर्यंत टिकतात. या टाइल्स प्रति पाऊल ७ वॅट वीज निर्माण करतात. २०१९ मध्ये, या टाइल्सने विमानतळाच्या डिस्प्ले लाइटिंगच्या १०% भागाला चालना दिली. आज या कंपनीने ३७ देशांमध्ये २५० ठिकाणी आपले ऊर्जा निर्मिती उत्पादन स्थापित केले आहे.

जपानः टोकियो स्टेशनवर प्रयोग केला...पण तो यशस्वी झाला नाही

जपानमध्ये हा प्रयोग मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला नाही. खरं तर, येथे सरासरी ६० किलो वजनाची व्यक्ती एका सेकंदात दोन पावले टाकून फक्त ०.१ वॅट वीज निर्माण करू शकली. या प्रमाणात, टाइल्सची देखभाल देखील महाग होती. म्हणूनच ते मोठ्या प्रमाणावर अंमलात आणले गेले नाही.

**काँक्रीटच्या उष्णतेपासून वीज निर्मिती**

शहरांना काँक्रीटचे जंगल म्हणतात. जेव्हा काँक्रीटच्या इमारती गरम होतात तेव्हा त्याही उष्णता वातावरणात सोडतात. यामुळे केवळ सभोवतालची उष्णता वाढत नाही तर जागतिक तापमानवाढ देखील वाढते. आता या उष्णतेपासून वीज निर्मिती करण्याची तयारी सुरू आहे.

२०२४ मध्ये, जपानमधील क्यूशू विद्यापीठातील संशोधकांनी एक सेंद्रिय टीईजी तयार केला जो खोलीच्या तापमानाला वीज निर्माण करतो. हे उपकरण उष्णता आणि ध्वनी कंपनांचा वापर करते. १७१ मीटरचा टीईजी पॅनेल १०-२० वॅट्स वीज निर्माण करू शकतो. सध्या हा प्रयोग प्रयोगशाळेच्या टप्प्यात आहे.

**भिंतींवरचा रंग वीज निर्माण करणार**

आजकाल अनेक घरांच्या छतावर सौर पॅनेल दिसतात. पण जर घराबाहेरील भिंतींवरचा रंग वीज निर्माण करणारे यंत्र बनला तर? ऑस्ट्रेलियाच्या आरएमआयटी विद्यापीठातील एका संशोधन पथकाने २०१७ मध्ये एक सौर रंग तयार केला. हा रंग सर्वप्रथम हवेतील आर्द्रता शोषून घेतो. नंतर सौरऊर्जेच्या मदतीने ते हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये मोडते. शेवटी या हायड्रोजनचा वापर वीज निर्मितीसाठी केला जातो. त्याची किंमत सौर पॅनेलपेक्षा ४०% कमी आहे.

**सांडपाण्यापासून वीज निर्मिती**


भारतात दरवर्षी ७० अब्ज लिटर सांडपाणी तयार होते. आता हे घाणेरडे पाणी आणि कचरा विजेचा खजिना बनू शकतो. काही संशोधक सूक्ष्मजीव इंधन पेशीच्या तंत्रज्ञानाचा वापर करून सांडपाण्यापासून वीज निर्मिती करण्याचा प्रयत्न करत आहेत.

सूक्ष्मजीव इंधन पेशी ही एक तंत्रज्ञान आहे जी जीवाणूंसारख्या सूक्ष्मजंतूंच्या मदतीने सेंद्रिय कचऱ्यापासून (उदा. खत, सांडपाणी) वीज निर्मिती करते. एक एमएफसी युनिट १ लिटर सांडपाण्यापासून ०.३-०.५ वॅट वीज निर्माण करू शकते. ते पाणी स्वच्छ करते, ज्यामुळे रासायनिक ऑक्सिजनची मागणी ७०-९०% कमी होते. अमेरिकेच्या पेन स्टेट युनिव्हर्सिटीमधील प्रोफेसर ब्रूस लोगन यांच्या लोगान लॅबमध्ये २००४ पासून एमएफसीवर काम केले जात आहे. येथे ते २६ मेगावॅट/चौ.मी. या वेगाने सांडपाण्यापासून वीज निर्माण करू शकतात.

तंत्रज्ञानाने प्रगत काही देशांमध्ये हे असे नवनवीन प्रयोग करून भविष्यात विज निर्मितीचे प्रयोग सुरू आहेत आणि त्यांना यशही येणार आहे.

■ ■ ■

# जागतिक पुस्तक दिन



आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गासीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला.

हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला.

वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत आहे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वषार्नुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.

वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो.

ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते.

वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो.

पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन.


डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो.

काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे.

आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

■ ■ ■

# समाजाचं वास्तव आत्मभान असणारी कथा : 'दौलत'




साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आणि त्याचे जीवन असते. त्याच्यासाठीच साहित्य संस्कृती, समाज, भाषा आणि इतरही घटक महत्त्वाचे असतात.साहित्य हे समाजाचे अपत्य असते.त्या काळाचे प्रतिनिधित्व साहित्य करते.

डॉ भालचंद्र नेमाडे यांनी 'कथेला चिंचोळा वाङ्.मय प्रकार म्हटले आहे. 'कथा वाचकाला अस्वस्थ आणि अंतर्मुख करते. वाचकांच्या भावनेला आव्हान करते. वाचकाला विचार करण्यास प्रवृत करते. मनाला अस्वस्थ करते. समाजातील समस्या, प्रश्न, मानवीवृत्ती प्रवृत्तीची परिणामकारकता कथेत असते.समाज परिवर्तनशील असतो. तसे साहित्यिकांनी या बदलांकडे डोळस, तितक्याच सहानुभूतीने पहावयाला हवे. जुन्या पण चांगल्यारिती, प्रथा, व्यक्ती, त्यांचे कार्य आणि शौर्य नवीन पिढीला प्रेरणादायी असतात. वर्तमानातही अशा व्यक्ती समाजाला प्रेरणादायी असतात.

गरीबी, दारिद्रय उपासमार, अन्याय अत्याचार शोषण या मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित संकटावर मात करुन श्रम, कष्ट, जिद्द, चिकाटी, निष्ठेवर विश्वास ठेवून आयुष्यात यशस्वी झालेल्या व्यक्तीचे चित्र, चरित्र परिणामकारक मांडून कथा लिहिणे हे कसदार कथालेखकाचे काम असते. हीच भूमिका घेऊन कथालेखन करणारे संवेदनशील, प्रतिभावान कवी, चिंतनशील लेखक, जाणकार समीक्षक म्हणजे डी. बी.जगत्पुरिया हे होतं. त्यांच्या कथा बुद्ध, फुले शाहू आंबेडकरांच्या प्रेरणेने जन्माला आल्या आहेत. या कथा पुरोगामी विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न करतात. डी. बी.जगत्पुरिया यांच्या 'दौलत' कथासंग्रहातील सर्वच कथा मानवी जीवनातील वेगवेगळ्या विषयाला स्पर्श करताना पहावयास मिळतात.

या संग्रहातील पहिलीच कथा 'आखाडा' ही होय. ही कथा विचार, संस्कार, नीती आणि अन्यायाचा प्रतिकार करणारी मानवतावादी प्रज्ञावंत माणसाची कथा आहे. 'झिंगरा' हा या कथेचा नायक सासरवाडीत राहून शेळीपालन करतो. त्याला बकरी चारायचं काम करावं लागलं.त्यामुळे त्याची 'हर्रर्रर...हाप' ची स्टाईल गावाकरांना परिचित होती. झिंगऱ्यांला पाहिलं की,गावातले पोट्टे 'पाव्हनंर हर्रर्रर.. हाप म्हणायचे.झिंगऱ्या पाव्हनाही न चिडता हर्रर्रर...चाप म्हणून प्रतिसाद द्यायचा ही खेळकरवृती त्याच्या ठिकाणी होती. आपण पाव्हणं आहोत ही जाणीव ही त्याला होती. गावातील उध्दट पोरं झिंगऱ्याला 'बकरक्या म्हणून चिडवयाचे तेव्हा मोलमजुरी करून त्याच्याशी संसार करणारी त्याची पत्नी काशी म्हणायची, मेल्यानो, मपला धनी गरीब आहे. कुणाच्या आध्यात नाही मध्यात, कुणाच्या देण्यात नाही घेण्यात नाही.बकरी चारणारा माणूस नसतो काय? तुमी कोन कलेक्टर लागून केलात रे? गरीबांना इभ्रतीने जगू द्या. खबरदार? तुम्ही त्याचं नाव घेतलं तर म्या वाघीन हाय वाघीन! आलं का टकुऱ्यात? बोलीभाषेतील जीवंत संवादामुळे या कथेला टोकदारपणा आला आहे.

पुढे त्यांना मुलगा होतो. मुलाचे नाव गबरू ठेवतात. त्याला शाळेत घालतात परंतु त्याला शिक्षणापेक्षा कुस्ती खेळण्याचा छंद असतो.त्यासाठी दोघेही आईवडील त्याला प्रोत्साहन देतात. अतिशय कष्टाने जीवन जगणारी माणसं प्रामाणिक असतात तसेच ते वेळप्रसंगी अन्यायाविरुद्ध बंडही करतात याची जाणीव ही कथा करून देते. गबरू अनेक आखाडे गाजवतो. कायम अपराजित विरोबा पैलवानाला गबरू चित करतो. नंतर त्याला सहकारी बँकेच्या मुख्य शाखेत मॅनेजर म्हणून नियुक्ती मिळते. गबरुच्या विजयामुळे त्याची गावात मिरवणूक काढली जाते. घरोघरी औक्षण केले जाते.

गावाचा रायभान पाटील शंभर रुपये ओवाळणी देऊन गबरुला छातीशी लावतो. मिरवणूकीत झिंगरा आणि काशीही होते. तो गावाच्या विजयाचा सण होता. गावाची प्रतिष्ठा, स्वाभिमान,अभिमान आणि गौरव होता. लेखकांनी या कथेमधून जे जमतंय ते चांगलं करा. निष्ठा ठेवून काम केल्यास निश्चितच जीवनात यश मिळते. कामाला प्रतिष्ठा आपणच मिळवून दिली पाहिजे. बकरे चारणाराही माणूसच असतो याची जाणीव करून देणारी ही कथा लेखकांनी अतिशय ताकदीने लिहिली आहे.

कर्मयोगी बाबाजी ही व्यक्तीचित्रणात्मक कथा आहे. गरीबी दारिद्रयावर मात करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद येथून पदवीचे शिक्षण पूर्ण करून शिक्षकांची नोकरी करतो. नंतर सरकारी नोकरी पाटबंधारे खात्यात मिळते अतिशय निष्ठेने, प्रामाणिकपणे नोकरी करून पशू पक्ष्यांना अन्न खाऊ घालतो. बाबाजी हा अद्वैतवादी, संवेदनशील नीतीमत्तेने जीवन जगणारा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांने प्रभावित झालेला नायक आहे. बाबाजीची दोन्ही मुले उद्योगशील आहेत. मुलगी सुरेखा सासरच्या जाचाला कंटाळून नवऱ्याचा त्याग करते. ती नर्सची नोकरी करते. ती सुसंस्कृत सभ्य असून बाबाजीने तिला दिलासा दिला. बाबाजीचं जीवन म्हणजे एखाद्या निर्मळ पुस्तकासारखे आहे. कसलाच अभिनिवेश नसलेल्या बाबाजीची व्यक्तिरेखा अतिशय आदर्शवादी आहे ती लेखकांनी अतिशय उठावदारपणे उभी केली आहे.

'भैय्यासाहेब' ही व्यक्तिचित्रणात्मक कथा आहे. या कथेचा नायक भैय्यासाहेब पुरोगामी विचाराचा विज्ञानवादी आहे. अन्यायाविरुद्ध बंड करणारा सर्वांना आपलंसं वाटणारा भैय्यासाहेब समाजसेवक आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राममध्ये स्वातंत्र्यसैनिक म्हणून कार्य केले परंतु त्यांनी पेन्शन घेतली नाही. आपण देशासाठी काम केले पैशासाठी नाही इतके देशप्रेम भैय्यासाहेबांच्या ठिकाणी होते. सावत्र आईचे ऐकून वडीलांनी घरच्या बाहेर काढलं तसं दुसऱ्या गावात जाऊन किरणा दुकान टाकून परिश्रम करून आत्मविश्वासाने जीवन जगणारा भैय्यासाहेब श्रेष्ठ व्यक्ती आहे. आत्महत्या करण्यास तयार झालेल्या भावाला गावात आणून त्याचे कुटुंब उभा करणारा, स्वाभीमानी, प्रेरणादायी भैय्यासाहेबांची स्वच्छ व निर्मळ व्यक्तीरेखा अतिशय तरलपणे उभी करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.शेवटी भैय्यासाहेब आजाराने मृत्यू पावले तेव्हा अनेक लोकांनी हळहळ व्यक्त केली.जो लोकांवर प्रेम करतो,त्यांच्यावरही लोक जीवापाड प्रेम करतात याची जाणीव करून देणारी कथा म्हणजे 'भैय्यासाहेब' ही होय.

----------(क्रमशः)----------

**डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
**उदगीर. ९९२२९६६५२६**

■ ■ ■

# इंग्रजी शाळेची क्रेझ, गुणवत्ता आणि भविष्य

**उत्तरार्ध**

आज स्वतःला जागतिक पातळीवर सिद्ध करायचे असेल तर इंग्रजी आवश्यक आहेच. आज अनेक नोकऱ्या देखील इग्लिश बोलण्यावरच आहेत. परंतु फक्त इग्लिश बोलण्यासाठी बालवाडीपासुन ते पदवी पर्यंत लाखों रुपए खर्च करण्याची काहीच गरज नाही.

बरं एवढा खर्च करूनही जे इग्लिश शाळेत जातात त्यांना किती इग्लिश येते हे तपासून बघितलं तर गुणवत्ता ढासाळत चालली आहे हे दिसून येते. व्हाट इज युवर नेम? वाट इज युवर फादर नेम? व्हाट इज युवर फुल नेम? हे तर मराठी शाळेतील पहिली दुसरीची विद्यार्थी बोलू शकतात. मग इंग्रजी शाळेत जाऊन नेमकं काय शिकले याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. कारण आज याचे उत्तर नाही शोधले तर या मुलांचे भविष्य अंधकारमय होणार आहे.

लाखों रुपये खर्च करून इग्लिश जर बोलता आले नाही, आपण शिकलेले इग्लिश मध्ये मांडता आले नाही तर नोकरी कुठे लागणार? शासकीय नोकरी कमी झाल्या आहेत पण शासकीय नोकरी साठी इग्लिश माध्यमाची सक्ती नाही. खाजगी कंपन्या मध्ये रोजगार संधी आहे तर ते इग्लिश बोलता आले तरच नोकरी देतात. आणि इग्लिश माध्यमातून शिकले म्हणल्यावर इग्लिश तर यायलाच पाहिजे. जर इंग्रजी येत नसेल मराठी जमत नसेल तर अशांना रोजगार कोण देईल?

बरं रोजगार मिळवण्यासाठी इग्लिश बोलता यायला पाहिजे तर बालवाडीपासुन इंग्रजी चा आग्रह का? कोणत्याही चांगल्या इग्लिश टिचर कडून चार पाच महिन्यात चांगली इग्लिश बोलणे शिकता येते तेही प्रत्येकाला परवडेल अशा किंमतीत. मग फक्त दरवर्षी निरर्थक खर्च कशासाठी? बरं एवढा खर्च करूनही नोकरी किंवा रोजगाराची शंभर टक्के शाश्वती आहे का? खर्च करूनही शाश्वती नसेल तर महाग शिक्षण कशाला मग?

खाजगी महाग शिक्षणावरचा खर्च टाळून सरकारने शिक्षण द्यावे यासाठी आग्रह धरला आणि पदवी पर्यंत चे खाजगी शिक्षणावरील पैसे बचत केले तर समजा शिकून नोकरी नाहीच लागली तर बचत झालेल्या पैशात छोटा मोठा उद्योग सुरू करून उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून घेता येईल. परंतु संपूर्ण बचत खाजगी शिक्षणावरच खर्च केली आणि शिक्षण पुर्ण झाल्यावर नोकरी नाहीच मिळाली तर भविष्य मात्र अंधारात जाईल आणि याला जबाबदार कोण राहील याचा विचार व्हावा.

म्हणून केवळ रोजगार पाहिजे म्हणून इग्लिश बोलता यायला पाहिजे असल्यास इग्लिश स्पोकन कोर्स करूनही इग्लिश बोलता येते. ज्यांची मुलं खरचं सातवी पर्यंत आहेत किंवा लहान मुल आहेत ज्यांना शाळेत टाकायचे आहे अशा मुलांच्या आई वडिलांपैकी एकाने जरी इग्लिश बोलणे शिकले तर मुलाचे भविष्य उज्वल होईल. कारण इग्लिश घरातच असल्याने त्याला बोलायला जास्त मेहनत घेण्याची गरज नाही. इग्लिश बोलायला शिकणे काही अवघड गोष्ट नाही. प्रत्येक विद्यार्थी पालक यांनी विचार करूनच आपल्या खर्चाचे नियोजन करून बचत करावी. आजची बचत उद्याची कमाई असते.

खाजगी शाळेला खुप मोठी रक्कम देऊन श्रीमंत केल्यापेक्षा तोच पैसा बचत करून लेकराच्या भविष्यासाठी ठेवला तर खुप मोठा आधार होईल. म्हणून मोठेपणा न करता वास्तव समजून शिक्षणाला महत्व द्यायला पाहिजे. फक्त उधळपट्टी म्हणजे शिक्षण मुळीच नाही. प्रत्येकाने इग्लिश शिकणे काळाची गरज आहे. त्यासाठी इग्लिश स्पोकन कोर्स चा आधार घेणे हाच सर्वोत्तम उपाय आहे.

----------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर**
**९१३०९७९३००**

■ ■ ■

# उन्हाळ्यात चक्कर येतो? रिकाम्या पोटी प्या हे खास पेय



जेव्हा तापमान वाढू लागते तेव्हा शरीराची ऊर्जा आपोआप कमी होऊ लागते. अशावेळेस आपले शरीर केवळ डिहायड्रेशनचे बळी पडत नाही तर पोषणाची कमतरता देखील जाणवू लागते. उन्हाळ्यात उष्णता वाढल्याने अशा समस्यांना तोंड द्यावे लागू नये म्हणून, आले आणि हळदीपासून बनवलेल्या एका खास पेयाबद्दल ही माहिती.

ते प्यायल्यानंतर उत्साही वाटेल आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत होईल. हे पेय शरीराला आतून डिटॉक्स करते. आले आणि हळदीपासून बनवलेले पेय केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर शरीरातील जळजळ देखील कमी करते. त्यामुळे पचनक्रिया देखील सुधारते.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते**

उन्हाळा केवळ उष्णता वाढवत नाही तर अनेक प्रकारचे संसर्ग आणि हंगामी फ्लू देखील घेऊन येतो. हळदीमध्ये असलेले करक्यूमिन शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. तर आले ऑक्सिडेटिव्ह ताणाशी लढण्यास मदत करते. हे नैसर्गिक पेय एका विशेष प्रकारच्या रोगप्रतिकारक शक्तीचे बूस्टर म्हणून काम करते जे शरीराला संसगार्शी लढण्यास मदत करते.

**मजबूत पचनसंस्था**

उन्हाळ्यात अनेकदा जास्त खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवतात. आले खाल्ल्याने लाळ, पित्त आणि जठरासंबंधी एंजाइमची पातळी वाढते. ज्यामुळे पचनाच्या समस्या वाढू लागतात. हळद आतड्यांमधील जळजळ कमी करते आणि ते निरोगी बनवते.

**नैसर्गिक डिटॉक्सिफायर**

उन्हाळ्याचा दिवसांमध्ये अनेकवेळा थकवा जाणवतो आणि शरीरात घाण साचू लागते. जर शरीर आतून डिटॉक्स करायचे असेल, तर तुम्ही हळद आणि आले असलेले हे खास पेय प्यावे. हे पेय यकृताचे कार्य मजबूत करते.

हे एक नैसर्गिक पेय आहे जे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्याची प्रक्रिया वेगवान करते. यामध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट गुणधर्म रक्त शुद्ध करण्यास मदत करतात.

**दाहक-विरोधी औषधांचे पॉवरहाऊस**

उन्हाळ्यात अनेक लोकांच्या सांध्यातील वेदना खूप वाढतात. यासाठी आले आणि हळदीयुक्त हे पेय प्यायल्याने यामध्ये आढळणारे दाहक-विरोधी गुणधर्म सनबर्न आणि सांधेदुखीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवतात.

**चमकदार त्वचेसाठी फायदेशीर**

शरीरात पाण्याची कमतरता टाळण्यासाठी, तुम्ही दररोज रिकाम्या पोटी आले आणि हळदीपासून बनवलेले हे पेय प्यावे. त्यात दाहक-विरोधी आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म आहेत. ज्यामुळे केवळ मुरुमे कमी होतातच असे नाही तर सूज कमी होते आणि त्वचा चमकदार होते.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## नख गळती

केसगळती मागोमाग
नख गळतीने
समाजमन झाले भयभित
निदान व्हावे लवकर
हेच जनतेला अपेक्षीत . .

शरीरातील टॉक्सीन
बाहेर पडल्यावर
नखे येतील पुर्ववत
वैद्यकीय अधिकाऱ्यांनी
व्यक्त केलेय मनोगत ..!

तज्ञांच्या आल्या चमू
घेऊन गेले नमुने
कारणे व उपाय मात्र
अद्यापही गुलदस्त्याच
आहे म्हणे..!

# एका मिनिटाचा आदेश

**वाचक लिहितात**

निर्णय घ्यायला आणि आदेश द्यायला एक मिनटही पुरेसा आहे. धर्माधिष्ठित राज्यात धमार्तील नैतिक मूल्ये शिक्षणातून सांगितली गेल्यामुळे राष्ट्रातील नागरीक, राज्यकर्ते, न्यायपालिका, आणि पोलीस-सैन्य ह्या नागरिकांच्या सुरक्षा यंत्रणांना धर्माच्या बाजूने म्हणजेच नैतिकतेच्या बाजूने तत्काल निर्णय देणे शक्य झाले असते.

आपल्या धार्मिक कर्तव्याची तर दूर पण नैतिक कर्तव्यांच्यासाठीही ठोस भूमिका घेण्यासाठी झगडावे लागत असेल तर आजपर्यंत आपले धर्मग्रंथ, ऋषीमुनी, संत, हिंदुत्वनिष्ठ विचारवंत यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या राज्यकर्त्यांची हिंदूंच्या संरक्षणाची हमी देता येत नसेल तर आपल्या वयाची इतकी तपश्चर्या ज्यासाठी झाली किंवा होत आहे ते व्यर्थ गेले, असे आपले पूर्वज म्हणतील.

केंद्र शासनाने बंगाल मधील सातत्याने होणाऱ्या हिंदू नरसंहारावर, पलायनावर तेथे तत्काळ राष्ट्रपती राजवट आणायला हवी. बंगालच्या मुख्यमंत्र्यांची राजकीय सभागृह किंवा सभागृहाबाहेरील चिथावणीखोर भाषणांसाठी त्यांना राजदंड म्हणून सैन्याने अटक करावी. सैन्याला पिडीत हिंदूच्या रक्षणासाठी आणि जिहादी, दहशतवादी नागरीकांच्या संहारासाठी तत्काळ पाचारण करावे. ही धमक प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि धर्मनिष्ठेमुळेच येऊ शकते. आपली भूमिका स्पष्ट असेल तर कुठलेही नरेटीव्ह आड येत नाही. निर्णय एका मिनिटाच्या आत देता येतो.

■ **भूषण प्रदीप वाळणुसकर, डोंबिवली.**

## महाराष्ट्रातील एसएमईकडून डिजिटल बँकिंग भागीदारीसाठी प्रयत्न: कोटक महिंद्रा बँकेचा पुढाकार



**मुंबई, २२ एप्रिल :** महाराष्ट्रभरातील लघु आणि मध्यम उद्योग (एसएमई) आपल्या व्यावसायिक गरजांनुरूप डिजिटल उपाययोजना देणाऱ्या बँकांसोबत भागीदारी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ही मागणी लक्षात घेऊन कोटक महिंद्रा बँकेने आपल्या कोटक फिन या व्यावसायिक बँकिंग सेवांना जसे व्यापार, खाते सेवा, वसुली आणि पेमेंट व्यवहार सुलभ करण्यासाठी तयार केलेल्या एकात्मिक डिजिटल उपाययोजना प्लॅटफॉर्मवर मोठा व्यवहार नोंदवला आहे. या प्लॅटफॉर्मचे उद्दिष्ट एसएमईंना एक सुलभ, पेपररहित अनुभव देण्याचे आहे.

कोटक महिंद्रा बँकेतील लघु आणि मध्यम उद्योग विभागाचे अध्यक्ष शेखर भंडारी यांनी ग्राहकांना प्रथम ठेवण्याबाबत बँकेच्या वचनबद्धतेला अधोरेखित केले. आमच्या एसएमई उद्योगाच्या केंद्रभागी ग्राहककेंद्रीभूतता आहे. कर्ज अत्यंत सुलभपणे उपलब्ध करून देण्याबरोबरच आम्ही एक सर्वांगीण दृष्टीकोन अंगीकारला आहे. आम्ही टर्नअराऊंड कालावधी कमी करून ग्राहक संबंध अधिक खोलवर रूजवले आहेत. अलीकडील महिन्यांमध्ये आम्ही अद्ययावत एआय आणि एमएल साधनांचा वापर करून निर्णय प्रक्रिया वेगवान केली आहे, असे ते म्हणाले.

आपल्या प्रगतीशील अर्थव्यवस्थेसाठी ओळखले जाणारे तसेच लोखंड आणि स्टील, प्लास्टिक व प्लास्टिक उत्पादने, खडे आणि दागिने, ऑटो सहाय्भूत सुविधा, आयटी आणि आयटीईएस, शिक्षण आण हॉस्पिटॅलिटी अशा महत्त्वाच्या उद्योगांचे केंद्र असलेल्या महाराष्ट्र राज्य बँकेच्या विस्तार धोरणाच्या केंद्रभागी आहे. एसएमई हा बँकेच्या वाढीच्या यशोगाथेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे भंडारी म्हणाले. आम्हाला भारतभरात या क्षेत्राच्या शाश्वत क्षमतेबाबत आत्मविश्वास आहे आणि महाराष्ट्रावर मुख्य लक्ष केंद्रित केले आहे. मागील काही वर्षांमध्ये एसएमईंनी प्रचंड विश्वास दर्शवला आहे आणि आम्ही भारताला १० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू.

या स्वप्नाला चालना देण्यासाठी बँक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहे, आपल्या व्यापक शाखा नेटवर्कद्वारे वेगाने वाढणाऱ्या एसएमई वातावरणाला सेवा देण्यासाठी क्षमता उभारणी करत आहे.

कोटक महिंद्रा बँकेने महाराष्ट्रात धोरणात्मक बाजारपेठा ओळखल्या असून त्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि औरंगाबाद यांचा समावेश आहे. त्यातून ते स्थानिक भागांवर लक्ष केंद्रित करून वाढीच्या नवनवीन संधींचा लाभ घेणार आहेत.

## ह्या 'वर्ल्ड बुक डे' ला कलाकार प्रेरणा देत आहेत आपल्या चाहत्यांना एखादे पुस्तक निवडून वाचण्याच्या जादूचा अनुभव घेण्यासाठी!

**मुंबई, २२ एप्रिल :** दरवर्षी २३ एप्रिल रोजी जगभरात वाचन, प्रकाशन आणि पुस्तकांची मजा लुटण्यासाठी वर्ल्ड बुक डे साजरा केला जातो. कादंबऱ्या वाचून एखाद्याला केवळ नवीन विश्वात हरवून जाता येत नाही तर त्याचसोबत अनेक ज्ञानात्मक आणि भावनिक फायदे प्राप्त होतात. त्यामुळे ताण कमी होतो, लक्ष केंद्रित होण्यास मदत होते, दुसऱ्यांबद्दल सहानुभूती निर्माण होण्यास मदत होते आणि संवादकौशल्यामध्ये भर पडते. पुस्तके प्रेरणा देतात, शिक्षण प्रदान करतात आणि काहीवेळा आपल्याला अंतर्बाह्य बदलण्यासाठीही कारणीभूत ठरतात. वर्ल्ड बुक डेच्या निर्मित्ताने झी टीव्हीवरील काही लाडके कलाकार भाग्यलक्ष्मीमधील ऐश्वर्या खरे, जागृति एक नयी सुबहमधील आर्य बब्बर, जमाई नं.१ मधील पापिया सेनगुप्ता, कैसे मुझे तुम मिल गयेमधील आकांक्षा चमोला आणि वसुधामधील अभिषेक शर्मा यांनी त्यांच्या वाचनाच्या आठवणी, त्यांची आवडती पुस्तके आणि वाचनामुळे त्यांच्या आयुष्यावर अर्थपूर्ण पद्धतीने कसा प्रभाव पडला आहे त्याबद्दल सांगितले.

झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबहमध्ये कलिकांत ठाकूरच्या भूमिकेतील आर्य बब्बर म्हणाला, जेव्हा मला स्वतःसाठी थोडा वेळ मिळतो तेव्हा मी हमखास एखादे चांगले पुस्तक उचलतो. माझ्या शूटिंगच्या व्यस्त वेळापत्रकातसुद्धा, वाचन कधी काम वाटत नाही उलट ते क्षणभरात माझे मन प्रसन्न करते. माझे पुस्तकांचे छोटेसे संकलन लहानपणीच सुरू झाले आणि ते माझ्यासोबतच वर्षानुवर्षं वाढत गेले. खरे सांगायचे तर मी किती पुस्तके वाचली आहेत याची आता मोजदादच नाही. एखाद्या कथेमध्ये हरवून जाण्यात एक वेगळीच जादू असते प्रत्येक प्रकरण एक नवीन प्रवास वाटतो, आणि पात्रे जणू जन्मभराचे सखे-सोबती बनून जातात. मला विविध शैलींचे वाचन करायला आवडते इतिहास, फिटनेस, प्रेमकथा, रहस्यकथा, नाट्यमय कथानके, आणि भावनिक समतोलावर आधारित पुस्तकेही. गॉन गर्ल, द मेड, द अंडरटेकिंग ऑफ हार्ट अ‍ॅण्ड मर्सी, प्राइड अ‍ॅण्ड प्रेज्युडिस ही काही माझ्या आवडत्या पुस्तकांपैकी आहेत आणि मला त्यांचे वाचन खूप आवडते. वाचन हा माझ्यासाठी फक्त छंद नाही तर एक अशी आवड आहे जी मला शहाणपण आणि आनंद दोन्ही देते. माझ्या आयुष्यात एक वेळ अशीही आली होती जेव्हा मी स्वतः एक पुस्तक लिहिले आणि ते प्रसिद्धही झाले आणि वाचकांनी त्यावर भरभरून प्रेमही केले.

झी टीव्हीवरील कैसे मुझे तुम मिल गयेमध्ये मानवीच्या भूमिकेतील आकांक्षा चमोला म्हणाली, मी आजपर्यंत वाचलेले सगळ्यात प्रभावी पुस्तकांपैकी एक म्हणजे भगवद्गीता. ती फक्त एक धार्मिक ग्रंथ नाही तर एक शाश्वत मार्गदर्शक आहे, जी मला स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि आयुष्यातील गुंतागुंतीतून स्पष्टता आणि हेतूसह पार करायला मदत करते. जेव्हा जेव्हा मला थांबावे, विचार करावा, किंवा स्वतःशी पुन्हा जोडावे असे वाटते तेव्हा आपल्या थोर ऋषी-महर्षींच्या शिकवणींमध्ये मला मोठा आधार मिळतो. मला आध्यात्मिक पुस्तके वाचायलाही खूप आवडतात विशेषतः अमी गणात्रा यांनी लिहिलेली महाभारत आणि रामायण यांच्या आवृत्त्या, ज्या प्राचीन ज्ञानाला समकालीन विचारांशी अतिशय सुंदरपणे जोडतात. याव्यतिरिक्त मला मर्डर मिस्ट्री, ट्रू क्राईम, आणि सायकोलॉजिकल थ्रिलर्सचेही जबरदस्त आकर्षण आहे. अशा पुस्तकांमध्ये जी गूढ कथा असते, ती मला पूर्णपणे गुंतवून ठेवते! सिडनी शेल्डन, पॅट्रीशिया कॉर्नवेल, गिलियन फ्लिन, अगाथा ख्रिस्ती, आणि फ्रीडा मॅकफॅडन हे माझे अतिशय आवडते लेखक आहेत. आणि अर्थातच, शेरलॉक होम्सचा माझ्या मनात नेहमीच एक खास कोपरा राहील त्याची तीव्र बुद्धिमत्ता आणि गुंतागुंतीच्या केसेस उलगडण्याचे कौशल्य मला प्रचंड भावते. माझ्यासाठी वाचन हा फक्त एक छंद नाही तर ती वैयक्तिक आणि खोल अनुभव देणारी एक प्रक्रिया आहे, जी माझ्या जिज्ञासेला खाद्य देते, विचारविश्व व्यापक करते आणि मला स्वतःशी जोडून ठेवते.

झी टीव्हीवरील भाग्यलक्ष्मीमध्ये लक्ष्मीच्या भूमिकेतील ऐश्वर्या खरे म्हणाली, कॅमेरे आणि स्क्रिप्ट्स माझ्या रोजच्या आयुष्याचा भाग होण्याच्या आधी, गोष्टी सांगण्याची खरी आवड मला पुस्तकांनीच दिली होती. हॅरी पॉटर हे माझे पहिले पुस्तक होते ज्यामुळे मला लिहिलेल्या शब्दांवर प्रेम जडले त्याने मला जादू, मैत्री, आणि आतून येणाऱ्या शक्तीची ओळख करून दिली. आजही जेव्हा मला थोडा आधार किंवा नवा दृष्टिकोन हवा असतो, तेव्हा मी हॅरी पॉटर परत वाचते. मी दर महिन्याला किमान एक पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करते कधी दुपारच्या जेवणाच्या वेळी, तर कधी शूटिंगच्या मधल्या वेळेत, कारमध्ये. वाचन माझ्यासाठी एक छोटेसे निवांत स्थान आहे एक प्रकारची थेरेपी, जी मला थोडा वेळ थांबायला आणि स्वतःशी पुन्हा जोडून घ्यायला मदत करते. पुस्तके आपल्याला खोलवर घडवतात. ती आपल्याला सहानुभूती शिकवतात, आपला जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विस्तारतात, आणि गरज असते तेव्हा आशा देतात. म्हणूनच जर तुम्ही कधीपासून एखादे पुस्तक वाचायचे ठरवत असाल तर वर्ल्ड बुक डे हे त्या सुरुवातीसाठी अगदी योग्य निमित्त आहे. छोट्यापासून सुरुवात करा, पण कुठूनतरी नक्की करा कोणती गोष्ट तुमचे आयुष्य बदलून टाकेल ते सांगता येत नाही.

## हायर इंडियाद्वारे ग्रॅव्हिटी सिरीज एसी लॉंच केले



**नागपूर, २२ एप्रिल :** सलग १६ वर्षांपासून नंबर १ जागतिक प्रमुख उपकरण ब्रँड असलेल्या हायर अप्लायन्सेस इंडियाने, एअर कंडिशनर्सच्या बहुप्रतिक्षित ग्रॅव्हिटी सिरीजचे अनावरण केले आहे. फॅब्रिक फिनिशसह भारतातील एकमेव एआई क्लायमेट कंट्रोल एअर कंडिशनर्स म्हणून, हे नाविन्यपूर्ण एसी, फॅब्रिक फिनिशसह बुद्धिमान शीतकरण तंत्रज्ञानाचे अखंडपणे एकत्रीकरण करून आधुनिक घरगुती हवामान उपायांसाठी नवीन मानक स्थापित करतात. ग्रॅव्हिटी सिरीज सात आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे - मॉर्निंग मिस्ट, मून स्टोन ग्रे, मिडनाईट ड्रीम, गॅलेक्सी स्लेट, अ‍ॅक्वा ब्लू, कॉटन कँडी आणि व्हाइट - जे वर्तमान काळातील अंतर्भागांना दर्जेदार छटा देत शीतकरणाची अतुलनीय कामगिरी पार पाडतात.

हायरने ग्रॅव्हिटी सिरीजमध्ये, अत्याधुनिक एआई क्लायमेट कंट्रोल टेक्नॉलॉजीसह घराच्या सौंदर्याला पूरक असलेल्या फॅब्रिक डिझाइनला एकत्रित करण्याद्वारे, कला आणि बुद्धिमत्तेला अखंडपणे एकत्र केले गेले आहे. या एकीकरणामुळे कलात्मक अभिव्यक्ती आणि चाणाक्ष कार्यक्षमता, परिपूर्ण सुसंवादात काम करतात, याची खात्री केली जाते. ग्रॅव्हिटी सिरीज ही, केवळ एक शीतकरण उपायापेक्षा बरेच काही आहे - ती अभिव्यक्तीचा एक प्रकार आहे, जो आधुनिक घरांच्या वातावरणाची शोभा वाढवतो आणि त्याचबरोबर उत्कृष्ट आराम, ऊर्जा कार्यक्षमता आणि घराचा वरच्या पातळीवरील अनुभव देतो.

या लाँचबद्दल बोलताना, हायर अप्लायन्सेस इंडियाचे अध्यक्ष एन.एस. सतीश म्हणाले, हायर इंडिया येथे, आम्ही जीवनशैलीशी नावीन्यपूर्णतेला अखंडपणे जोडणारी उत्पादने देण्यासाठी वचनबद्ध आहोत. नवीन ग्रॅव्हिटी सिरीज ही, याच स्वप्नाचे एक प्रतिबिंब आहे - एक एअर कंडिशनर जो जितका शैलीदार आहे तितकाच तो बुद्धिमान आहे. भारतातील एकमेव एआई क्लायमेट कंट्रोलसह, ही सिरीज, ऊर्जा कार्यक्षमता सुनिश्चित करताना वैयक्तिकृत आरामाची नवीन व्याख्या सांगते. आमच्या अत्याधुनिक भारतीय उत्पादन सुविधांमध्ये निर्मित ही सिरीज, आमच्या 'मेक इन इंडिया, मेड फॉर इंडिया' या वचनबद्धतेचे खरे मूर्त स्वरूप आहे - जी विशेषतः भारतीय ग्राहकांच्या आणि हवामानाच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

हायर ग्रॅव्हिटी सिरीज ५-स्टार एआई क्लायमेट कंट्रोल एअर कंडिशनरची रेंज ५१,९९० रुपयांपासून उपलब्ध आहे आणि ती, हायरची वेबसाइट, आघाडीचे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, सर्व प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स स्टोअर्स आणि भारतातील रिटेल आउटलेटमधून खरेदी करता येईल.

## भारतातील सर्वात मोठा समस्या सोडवणारा मूल्यांकन मंच असलेल्या एचसीएल जिगसॉने सहाव्या आवृत्तीसाठी नोंदणी सुरू!



**दिल्ली, २२ एप्रिल :** एचसीएल ग्रुप, १३.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचा जागतिक समूह, ने शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतातील सर्वात मोठा समस्या सोडवणारा मूल्यांकन मंच, एचसीएल जिगसॉच्या सहाव्या आवृत्तीची घोषणा केली. नावीन्यपूर्णता आणि विश्लेषणात्मक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेले, एचसीएल जिगसॉ तरुणांना सर्जनशील आणि तार्किक विचारसरणीद्वारे वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम करत आहे. हे व्यासपीठ इयत्ता ६ ते ९ मधील शालेय विद्यार्थ्यांना संशोधन, समीक्षात्मक विचारसरणी आणि संवाद यासह २१ व्या शतकातील प्रमुख कौशल्यांचे मूल्यांकन करते आणि त्यांना वास्तविक जगातील आव्हाने सोडवण्यासाठी या कौशल्यांचा वापर करण्यास मदत करते. इच्छुक विद्यार्थी किंवा शाळा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत www.hcljigsaw.com वर नोंदणी करू शकतात.

एकूण १२ लाखांहून अधिक बक्षिसांची रक्कम अंतिम स्पर्धकांना दिली जाईल ज्यामध्ये एचसीएलच्या इनोव्हेशन लॅब्समध्ये शिकण्याच्या संधींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, एचसीएल जिगसॉ मोफत नोंदणीची सुविधा देत आहे, सर्व शालेय विद्यार्थ्यांना कोणत्याही शुल्काशिवाय सहभागी होण्यासाठी आमंत्रित करते. सहाव्या आवृत्तीत, प्रकल्प-आधारित आव्हानाचे ध्येय या वर्षी सहयोग करणे, निर्मिती करणे आणि जिंकणे आहे.

या संपूर्ण भारतभर चालणाऱ्या उपक्रमाचे उद्दिष्ट भारतातील सर्वोत्तम तरुण समस्या सोडवणाऱ्यांचा समुदाय विकसित करणे आहे, त्यांच्या गंभीर विचार करण्याच्या क्षमता ओळखून आणि त्यांना कठोर मूल्यांकन प्रक्रियेद्वारे पुरस्कृत करणे आहे. हा उपक्रम भारताच्या नवीन शिक्षण धोरणाशी (एनईपी) सुसंगत आहे, ज्यामुळे संज्ञानात्मक शिक्षण आणि भविष्यासाठी तयार कौशल्ये वाढतात.

या उपक्रमाबद्दल विचार करताना, एचसीएल ग्रुपचे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट आणि ब्रँड प्रमुख रजत चंडोलिया म्हणाले, एचसीएलमध्ये, आम्ही गतिमान जगात भरभराटीसाठी कौशल्यांनी सुसज्ज करून तरुण मनांच्या क्षमतेला चालना देण्याचे उद्दिष्ट ठेवतो. एचसीएल जिगसॉ ही क्विझ नाही, ऑलिंपियाड नाही, तर तरुण विचारवंत, सहयोगी आणि निर्मात्यांसाठी एक लाँचपॅड आहे. आम्हाला आतापर्यंत प्रचंड सहभाग मिळाला आहे आणि या आवृत्तीत आणखी शाळांना त्यांच्या विद्यार्थ्यांची क्षमता उघड करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी आम्ही रोमांचित आहोत, जिथे वर्गखोल्या वास्तविक जगाला भेटतात.

## सॅमसंगकडून भारतात सेगमेंटमधील सर्वात स्लिम स्मार्टफोन गॅलॅक्सी एम५६ ५जी लाँच



**गुरूग्राम, २२ एप्रिल :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलॅक्सी एम५६ ५जी च्या लाँचची घोषणा केली. हा त्याच्या सेगमेंटमधील सर्वात स्लिम स्मार्टफोन आहे. लोकप्रिय गॅलॅक्सी एम सिरीजमधील नवीन स्मार्टफोन वापरकर्त्यांना उच्च दर्जाचा स्मार्टफोन अनुभव देतो, जेथे पुढील व मागील बाजूस गोरिला ग्लास व्हिक्टस+ संरक्षण, ५० मेगापिक्सल ट्रिपल कॅमेरासह ओआयएस व १२ मेगापिक्सल फ्रण्ट एचडीआर कॅमेरा आणि प्रगत एआय एडिटिंग टूल्स आहेत.

''अर्थपूर्ण इनोव्हेशन्स वितरित करण्याप्रती आमच्या अविरत कटिबद्धतेचा भाग म्हणून आम्हाला स्टाइल, टिकाऊपणा आणि अभूतपूर्व कार्यक्षमतेचे शक्तिशाली संयोजन असलेल्या गॅलॅक्सी एम५६ ५जी च्या लाँचची घोषणा करताना अभिमान वाटतो. हा त्याच्या सेगमेंटमधील सर्वात स्लिम स्मार्टफोन आहे, तरीदेखील दीर्घकाळापर्यंत कार्यरत राहण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. या स्मार्टफोनच्या पुढील व मागील बाजूस गोरिला ग्लास व्हिक्टस+ संरक्षण आहे, ज्यामुळे आतापर्यंतच्या सर्वात शक्तिशाली एम सिरीज स्मार्टफोन आहे. फ्रण्ट एचडीआर कॅमेरासह क्षणांना कॅप्चर करायचे असो किंवा प्रगत एआय एडिटिंग टूल्ससह क्रिएटिव्ह शक्यतांना एक्स्प्लोअर करायचे असो गॅलॅक्सी एम५६ ५जी त्याच्या पॉवर-पॅक वैशिष्ट्यांसह स्मार्टफोन अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे,'' असे सॅमसंग इंडियाच्या एमएक्स बिझनेसचे संचालक अक्षय एस. राव म्हणाले.

प्रीमियम डिझाइन आणि डिस्प्ले

मागील बाजूस प्रीमियम ग्लास आणि मेटक कॅमेरा डेकोसह गॅलॅक्सी एम५६ ५जी गॅलॅक्सी एम सिरीजमध्ये उत्साहवर्धक व प्रीमियम डिझाइन अपग्रेड आणतो. सेगमेंटमधील सर्वात स्लिम असण्यासह गॅलॅक्सी एम५६ ५जी ची जाडी फक्त ७.२ मिमी आहे आणि पुढील व मागील बाजूस कॉर्निंगएँ गोरिलाएँ ग्लास व्हिक्टसएँ संरक्षण असेल, ज्यामुळे हा स्लीक व शक्तिशाली स्मार्टफोन आहे. ६.७ इंच फुल एचडी+ सुपर एएमओएलईडी+ डिस्प्ले असलेला गॅलॅक्सी एम५६ ५जी ग्राहकांना आकर्षक व्हिज्युअल्स आणि उत्साहवर्धक व्युइंग अनुभव देतो. मोठे डिस्प्ले १२०० नीट्स हाय ब्राइटनेस मोड (एचबीएम) आणि व्हिजन बूस्टर तंत्रज्ञानासह येतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना प्रखर सूर्यप्रकाशात देखील त्यांच्या आवडत्या कन्टेन्टचा प्रभावीपणे आनंद घेता येतो. १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट तंत्रज्ञानप्रेमी जनरेशन झेड आणि मिलेनियल ग्राहकांसाठी सोशल मीडिया फिडमधून स्क्रॉलिंग सोपे करते. गॅलॅक्सी एम५६ ५जी लाइट ग्रीन आणि ब्लॅक या दोन आकर्षक रंगांमध्ये येईल.

## ओप्पो लॉन्च करत आहे के१३ ५जी एक अप्रतिम कामगिरी करणारा स्मार्टफोन



**मुंबई, २२एप्रिल :** ओप्पो इंडिया ने लॉन्च केला आहे ओप्पो के१३ ५जी, जो पॉवर कार्यक्षमता आणि प्रीमियम यूझर अनुभवासह परफॉर्मन्सचा जबरदस्त अनुभव देण्यासाठी बनवण्यात आला आहे. Snapdragon 6 Gen 4 मोबाइल प्लॅटफॉर्म द्वारा संचालित या डिव्हाईसमध्ये 80W SuperVooC फास्ट चार्जर, या सेगमेन्टमधील आघाडीचे व्हीसी कूलिंग, एक १२० हर्ट्झ एफएचडी+ एमोलेड डिस्प्ले आणि इंटेलिजन्ट नेटवर्क ऑप्टिमायझेशनसह 7000mAh ग्रॅफाईट बॅटरी आहे. ज्यामुळे, सुरळीत मल्टीटास्किंग, गुंतवून ठेवणारे गेमिंग, प्रदीर्घ बॅटरी लाईफ आणि विश्वासार्ह कनेक्टिव्हिटी मिळते. ओप्पो के१३ ५जी मधून अर्थपूर्ण इनोव्हेशनबाबतची ओप्पो ची वचनबद्धता झळकते. या फोनमध्ये आपल्या सेगमेन्टमध्ये परफॉर्मन्सची नव्याने व्याख्या करण्यासाठी प्रगत इंजिनियरिंग आणि परिष्कृत डिझाईनचे संयोजन करण्यात आले आहे.

ओप्पो इंडियाचे हेड ऑफ प्रॉडक्ट कम्युनिकेशन्स, सॅव्हिओ डिसूझा म्हणाले, ओप्पो के१३ ५जी च्या लॉन्चसह आम्ही २०००० रु. च्या खालील सेगमेन्टमध्ये ओपी एक्सपिरीयन्स घेऊन येत आहोत- कोणत्याही तडजोडीशिवाय! ते या सेगमेन्ट मधील सर्वोत्तम व्हीसी कूलिंग Snapdragon 6 Gen 4 चिपसेट असो किंवा आमची इंटेलिजन्ट ग्रॅफाईट बॅटरी टेक्नॉलॉजी असो, के१३ चा प्रत्येक पैलू किंमतीच्या प्रमाणात उत्कृष्ट परफॉर्मन्स देण्यासाठी बनवला आहे. हे उपकरण दमदार, विश्वसनीय टेक्नॉलॉजीचे लोकशाहीकरण करण्याच्या आणि दर्जेदार फीचर्स जास्तत जास्त लोकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या ओप्पो च्या व्हिजनशी सुसंगत आहे.

Qualcomm इंडिया येथील हेड ऑफ मोबाइल, कम्प्युट आणि एक्सआर बिझनेस, सौरभ अरोरा म्हणाले, यूझर अनुभव उन्नत करणारे इनोव्हेशन प्रदान करण्याबाबत आम्ही वचनबद्ध आहोत. Snapdragon 6 Gen 4 द्वारा संचालित ओप्पो के१३ साठी ओप्पो सोबत भागीदारी केल्यामुळे आम्ही मोबाईलच्या उपयोगकर्त्यांना आणि गेमर्सना बेजोड परफॉर्मन्स आणि प्रतिसादक्षमता प्रदान करू शकत आहोत.

फ्लिपकार्टच्या व्हाईस प्रेसिडेंट मोबाइल्स, स्मृती रविचंद्रन म्हणाल्या, फ्लिपकार्टमध्ये आम्हाला किंमतीशी तडजोड न करता परफॉर्मन्स, बॅटरी लाइफ आणि डिझाईन यांची सांगड घालणाऱ्या स्मार्टफोन्सची वाढती मागणी स्पष्ट दिसत आहे. ओप्पो के१३ ५जी चे लॉन्चिंग या ट्रेंडशी सुसंगत आहे आणि देशभरातील आमच्या ग्राहकांसाठी हे उपकरण घेऊन येताना आम्हाला आनंद होत आहे. आमचे मत आहे की, ओप्पो च्या विश्वासार्ह इनोव्हेशनचे पाठबळ असलेली फीचर्स असलेला के१३ हा स्मार्टफोन गेमिंग, कंटेंट क्रिएशन किंवा दैनंदिन उत्पादकतेबाबत आपल्या फोनकडून अधिक अपेक्षा करणाऱ्या ग्राहकांना नक्की आवडेल.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून अर्थ डे निमित्त पुन्हा एकदा शाश्वत पर्यावरणासाठी आपली वचनबद्धता जाहीर

**मुंबई, २२एप्रिल :** अर्थ डे निमित्त यावर्षी संपूर्ण जग अवर पॉवर, अवर प्लॅनेट या थीमनुसार एकत्रित येत असताना आम्हाला देखील या गोष्टीची जाणीव आहे कि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकावर आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या (टीकेएम) मूलभूत मूल्यांमध्येच ही जबाबदारी समाविष्ट



करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही सातत्याने नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारची इलेक्ट्रिफाईड वेहिकल टेक्नॉलॉजी विकसित करत आहोत, ज्यामध्ये पर्यायी इंधनावर चालणाऱ्या पॉवरट्रेन्सचा (वाहनांचा) समावेश आहे. या प्रयत्नांत आम्ही अनेक मार्गांनी काम करत आहोत, त्याचबरोबर अक्षय ऊर्जेचा (रिनिवेबल एनर्जी) वापर करून सामूहिक शाश्वत उपक्रमांचे नेतृत्व करत आहोत जेणेकरून पर्यावरणदृष्ट्या सक्षम जग घडवता येईल. जागतिक पातळीवर २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या टोयोटाच्या इन्व्हॉयर्मेन्टल चॅलेंज २०५० (चॅलेंज १-६) शी सुसंगत राहून, आम्ही टीकेएममध्ये उत्पादनांच्या पलीकडे जाऊन मॅनुफॅक्चरिंग प्रक्रियेत आणि संपूर्ण व्हॅल्यू चेनमध्ये शाश्वत पद्धतींचा समावेश करत कार्बन-न्यूट्रल बनण्याकडे आमचा प्रवास वेगाने पुढे नेत आहोत.

टोयोटा ग्रीन व्हेव प्रकल्पाअंतर्गत, मियावाकी पद्धतीने आतापर्यंत ३,२८,००० पेक्षा जास्त झाडे लावण्यात आली आहेत. यामुळे परिसंस्था पुन्हा निर्माण झाली असून ७९० हून अधिक स्थानिक झाडांच्या जाती आणि ४०० हून अधिक प्राणी व पक्ष्यांच्या जाती आमच्या कारखान्याच्या परिसरात नांदत आहेत. गेल्या वर्षात आमच्या परिसराबाहेर ८,००० हून अधिक झाडे लावण्यात आली, जेणेकरून आपला हरित परिसर आणखी वाढवता येईल. एकोझोन हे आमचे २५ एकर जागेतील अनुभवाधारित पर्यावरण शिक्षण केंद्र असून त्यामार्फत ४०,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना व इतर सहभागी सदस्यांना पर्यावरणाविषयी माहिती आणि प्रोत्साहन मिळाले आहे, सकारात्मक बदल घडून आला आहे ज्यातून पर्यावरण संरक्षक घडत आहेत. २०३५ पर्यंत आम्ही कार्बन-न्यूट्रल मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रिया पूर्णपणे लागू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी आम्ही ऊर्जेचा कार्यक्षम वापर, शाश्वत साहित्याचा वापर, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि क्लीनर टेक्नॉलॉजीचा वापर या गोष्टींवर भर देत आहोत हे सर्व एकत्रितपणे पर्यावरणावर होणारा हानिकारक परिणाम कमी करत आहेत. या सर्व उपक्रमांव्यतिरिक्त, आम्ही आमचे चांगले पर्यावरणीय उपाय आमच्या पुरवठादारांशी, डीलर्सशी, लॉजिस्टिक्स भागीदारांशी आणि समाजातील सदस्यांशी शेअर करत आहोत जेणेकरून आमच्या कारखान्याबाहेरही पर्यावरणावर चांगला प्रभाव पडावा.


## आज का अंदाज

बुधवार २३ एप्रिल २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ११९ | १६७ | ११५ | ४४० | ६७९ | २३० | १७८ | १३३ |
| ३९९ | ३४७ | ४४९ | २७९ | ४९९ | ३५७ | ३५८ | २५० |
| ४७० | ६८० | ८९० | १२५ | ३३६ | १२२ | २७७ | ४५८ |
| १० | ४० | ७३ | ८३ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १२ | ४२ | ७५ | ८५ | २१ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ | २९ | ५९ | ६३ | ७३ |

२३ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २३ | ३२ | ६४ | ९४ |
| २७ | ३८ | ६७ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कामात किंवा व्यवसायात बदल करावे लागतील. पण धोकादायक निर्णय घेणे टाळा. वाणीवर नियंत्रण ठेवा. तुमच्या बोलण्यामुळे तुमचा प्रियकर नाराज होईल. एखाद्या कामासाठी प्रवास करावा लागेल.

**वृषभ :** आज, शारीरिक आरोग्यापेक्षा मानसिक आरोग्य चांगले राहील. प्रिय व्यक्तीच्या खराब आरोग्याबद्दल थोडी चिंता जाणवेल. प्रवास करताना बाहेरील पदार्थ खाणे टाळा. अन्यथा, त्रास आणि वेदना होऊ शकतात.

**मिथुन :** नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना यश मिळेल. आजचा दिवस सामान्य राहील. विरोधकांपासून सावध राहा. इतरांच्या गोष्टीत ढवळाढवळ करू नका. आरोग्यात सुधारणा दिसेल.

**कर्क :** बजयाच दिवसांपासून रखडलेली कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. आरोग्यात सुधारणा जाणवेल. वडीलधाजयांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आजचा दिवस खरेदी करण्यात जाईल.

**सिंह :** आज तुम्हाला काही परीक्षा किंवा स्पर्धेत यश मिळेल. पत्रकारिता क्षेत्राशी संबंधित लोकांना त्यांच्या लेखन किंवा कामाबद्दल त्यांच्या बॉसकडून कौतुक मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस असेल.

**कन्या :** आज तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. तुमचे मन कोणासोबत तरी शांत राहील. प्रेमसंबंधांमध्ये, आज परस्पर वर्तनात उदासीनता दिसून येईल.

**तुळ :** आज जमा केलेल्या भांडवलात वाढ होईल. भविष्यात वाहन चालविण्याद्वारे पैसे मिळतील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. अन्यथा नुकसान होऊ शकते. आरोग्याची काळजी घ्या.

**वृश्चिक :** कुटुंबातील सदस्यांकडून तुम्हाला अपेक्षित सहकार्य मिळेल. एखादा जुना मित्र बजयाच दिवसांनी भेटेल. मन आज काही गोष्टींमुळे चिंतित राहू शकते. आजचा दिवस चांगला आहे. व्यवसायात नफा होईल.


**धनु :** आज मुलांच्या आनंदात वाढ होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस निर्माण होईल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. कामाच्या ठिकाणी एखादा विरोधक वरिष्ठ तुमच्याविरुद्ध भडकावू शकतो.

**मकर :** कुटुंबातील सदस्य तुमच्या निर्णयाने आनंदी राहतील. व्यवसायात चांगली कमाई होईल. प्रेमसंबंधांमध्ये वाहन, घर, जमीन इत्यादी मौल्यवान भेटवस्तू मिळण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** व्यवसायात नवीन मित्रांकडून तुम्हाला सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कार्यक्षम व्यवस्थापनाचे कौतुक होईल. व्यवसायात यश कठोर परिश्रमानंतरच मिळेल.

**मीन :** आज मुलांमुळे आनंदात वाढ होईल. उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना घरापासून आणि पालकांपासून दूर जावे लागेल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. विरुद्ध पक्षाबद्दल विशेष आकर्षण असेल.

## शब्दकोडे क्रमांक २०९३




**आडवे शब्द :-**
१) मातापिता
५) **** *** राजाराम, पतित पावन सीताराम
१०) मध्यस्थ
११) सूर्य
१२) चांदी
१३) कातडी
१४) मंडपाच्या किंवा छताच्या शिखराचा मध्यभाग
१७) इंद्र
१८) उपयोग
२०) नूतन
२२) असुर
२४) एक छोटे चर्मवाद्य
२७) लायसेन्स (म.)
२९) उद्याच्या नंतरचा दिवस
३१) भय, भीती, शंका
३३) किंमत
३४) लोणच्यातील द्रवमसाला
३५) झोपेचे खोबरे, जागे राहणे
३६) सतत भटकणारा
३९) सोने
४१) मोठ्ठी गंमत
४३) चंद्र
४५) पिकांचा एक हंगाम
४७) ओझी वाहणारा
४८) मूर्ती तयार करणारा
५०) फकीर, भिक्षेकरी, मदारी
५२) चाल सभ्यपणाची रीत
५५) कर्ज देणारा
५६) गुणाकार
५७) जाणे
५९) अर्धी ओंजळ
६१) पक्का चोर, गुन्हेगार, वस्ताद,
६२) विधवा
६४) पृथ्वी
६६) व्यायाम
६८) निबिड अरण्य
६९) माळ, हार
७०) रम्य
७३) अस्ताव्यस्त पडलेले सामान
७५) समाधान होणे (वा.प्र.)
७७) सततची हालचाल
७८) वजन,
७९) रक्षण करणारा

**उभे शब्द :-**
१) जहाज, नौका इ सागरी वाहन
२) नूतन
३) पाऊल (हिं.)
४) आश्चर्य
५) रविवार
६) दुर्दशा
७) तृतीया
८) रात्रीचा पाऊस
९) सरपण, कोळशाचे दुकान
१५) दार
१६) सगळा, जमिनीवरील कर
१९) पंख
२१) उपयोग
२३) जैन साधू
२५) भिंतीतील कपाट
२६) चलनवलन
२८) नाचणी
३०) यात्रेला नियमित जाणारा
३२) फणसातील खाद्यभाग
३४) जनगणना
३७) मधमाशी
३८) **** करके हमे यूं न जाईये, आपको हमारी कसम लौट आइये' एक हिंदी चित्रपट गीत
४०) अर्भकाचा गळा दाबून खून करणे (वा.प्र.)
४२) सामान
४४) थोडे, लव
४६) काकुळतेने आर्जव करणे (वा.प्र.)
४७) बंगला, मोठा वाडा
४८) एक रंगीत लाकूड
४९) कशा प्रकारचा
५१) पडदा
५३) तो पर्यंत
५४) गतिमान
५६) राजाची अत्यंत आवडती राणी
५८) नरसिंह
६०) तात्पर्य
६२) अदृष्य
६३) मोठी आग, चिता
६५) लहान
६६) वाळवी
६७) पोत्याचे कापड
७१) सापाची एक जात
७२) गाण्यातील एक शब्दालंकार
७४) प्रामाणिक
७५) ओटा, कट्टा
७६) हिन्दीत पुन्हा


(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# निरामय

## प्रोटीन वाढल्याचा किडनीवर दुष्परिणाम



किडनी हा शरीराचा महत्त्वाचा भाग आहे. पण खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि बिघडलेल्या जीवनशैलीमुळे या अवयवासंबंधी अनेक आजार होऊ लागतात. शरीरात प्रोटीनची पातळी वाढली तरी किडनी खराब होऊ शकते. याविषयी अधिक जाणून घेणे गरजेचे आहे.

एखाद्या व्यक्तीच्या शरीरातील प्रथिनांची पातळी वाढली तर किडनीवर दबाव वाढू शकतो. त्यामुळे किडनीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. मूत्रपिंडाचे कार्य मंदावल्यामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर काढण्यात अडचण येते. किडनी खराब होते. साधारणपणे आहारात जास्त प्रथिने घेतल्याने शरीरातील प्रथिनांची पातळी वाढते. म्हणूनच मूत्रपिंड निकामी होण्याची लक्षणे दिसताच डॉक्टर 'केएफटी' चाचणी करण्याची शिफारस करतात. त्यामध्ये शरीरातील प्रोटीनच्या पातळीविषयी नेमकेपणाने समजते.

**प्रथिनांची पातळी किती असावी?**

शरीरातील प्रथिनांची सामान्य पातळी ६.४ ते ८.३ ग्रॅम/डीएल (डेसीलिटर) असते. ते ८.३ ग्रॅम/डीएलपेक्षा जास्त असेल तर उच्च प्रथिने मानले जाते. यामुळे स्नायू कमकुवत होणे, थकवा जाणवणे, किडनीचा त्रास आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. म्हणूनच लघवी करताना जळजळ होत असेल, पाठदुखी आणि सतत अशक्तपणा जाणवत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**प्रथिनांची पातळी कशी नियंत्रित करावी?**

शरीरातील प्रथिनांची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात धान्य, फळे आणि भाज्यांचे सेवन करा. प्रथिनांचे अतिरिक्त प्रमाण कमी करण्यासाठी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचे प्रमाण मर्यादित करा. म्हणजेच हा त्रास असेल तर अंडी, मासे आणि कडधान्ये जास्त प्रमाणात खाणे टाळा. नियमित व्यायामामुळे प्रथिनांची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. यासाठी दररोज किमान अर्धा तास व्यायाम करणे गरजेचे आहे. पुरेशा प्रमाणात पाण्याचे सेवन केल्यासही प्रथिनांची पातळी नियंत्रित राखण्यास मदत होते. दररोज किमान आठ ग्लास पाणी पिणे महत्त्वाचे आहे.

आरोग्यचर्चा
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

## आता युवतींमध्येही 'एण्डोमेट्रिऑसिस'ची समस्या

प्रत्येक मुलीला मासिक पाळीच्या काळात शरीराकडे लक्ष देण्याचे शिक्षण दिले पाहिजे. विशेषत: वेदनांची तीव्रता आणि रक्तस्रावाच्या प्रमाणाबद्दल त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे.

मासिक पाळीच्या काळात शरीराबाहेर टाकले जाणारे गर्भाशयाचे अस्तर म्हणजे 'एण्डोमेट्रिअम'. अशाप्रकारचे अस्तर अंडाशयाभोवती आढळण्याच्या स्थितीला 'एण्डोमेट्रिऑसिस' म्हटले जाते. ही अवस्था त्रासदायक असते. तेव्हा त्याच्या लक्षणांबाबत मुली आणि महिलांना माहीत असणे तसेच त्याचे वेळीच निदान होऊन योग्य ते उपचार करणे गरजेचे ठरते. 'एण्डोमेट्रिऑसिस' अंडाशय, फॅलोपियन ट्यूब आणि इतर पेल्विक भागात पसरू शकते. ते सहसा प्रौढ महिलांमध्ये दिसून येत असले तरी हल्ली ही समस्या किशोरवयीन मुलींमध्ये देखील मोठ्या प्रमाणात आढळून येते. बऱ्याच वेळा मासिक पाळीचे दुखणे समजून 'एण्डोमेट्रिऑसिस'कडे दुर्लक्ष केले जाते. या स्थितीचे नेमके कारण अद्याप ज्ञात नाही; मात्र अनुवंशिकता, संप्रेरकांचे असंतुलन आणि रोगप्रतिकारक प्रणालीच्या समस्या यासारखे घटक यास कारणीभूत ठरतात. किशोरवयीन मुलांमध्ये 'एण्डोमेट्रिऑसिस'च्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये ओटीपोटात तीव्र वेदना, मासिक पाळीतील वाढता रक्तस्राव, कंबरदुखी, थकवा, आतड्यांमध्ये वेदना, सूज येणे, मळमळ, लघवी करताना वेदना होणे, मासिक पाळी दरम्यान स्पॉटिंग आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण यांचा समावेश असू शकतो.

**'एण्डोमेट्रिऑसिस'विषयी जागरूकता महत्त्वाची**

'एण्डोमेट्रिऑसिस'ची लक्षणे तीव्र होण्यापूर्वी निदान होणे गरजेचे आहे. वेळीच उपचार मिळाले तर किशोरवयीन मुलींच्या भविष्यातील त्रास कमी होऊ शकतो. बऱ्याच मुली मासिकपाळी दरम्यान आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल जास्त बोलत नाहीत. पण यामुळे निदान होण्यास विलंब होऊ शकतो आणि स्थिती बिकट होऊ शकते. गुंतागुंत वाढू शकते. त्यामुळेच या धोक्याविषयी बोलले गेले पाहिजे.

जाणून घ्या
**डॉ. मेघा दळे**

**प्रजनन क्षमतेवर परिणाम**

'एण्डोमेट्रिऑसिस'मुळे तीव्र वेदना होतात. त्या असह्य असतात. जास्त रक्तस्त्रावामुळे भविष्यात अपत्य जन्माला घालण्याच्या महिलांच्या क्षमतेवरदेखील परिणाम होऊ शकतो. या त्रासामुळे इतर अवयवांनाही गंभीर नुकसान होऊ शकते. आजाराच्या तीव्र वेदनांना तोंड देणे केवळ शारीरिक आरोग्यावरच नव्हे तर मानसिक आरोग्यावरही परिणाम करते. सुरुवातीच्या टप्प्यातच निदान झाले तर योग्य उपचार मिळू शकतात. त्याचे सकारात्मक परिणाम अनुभवास येतात.

**उपचार काय?**

या आजारावरील उपचारांमध्ये वेदना कमी करणारी औषधे, हार्मोनल थेरपी किंवा काही प्रकरणांमध्ये अतिरिक्त ऊती काढून टाकण्यासाठी किरकोळ शस्त्रक्रियेचा समावेश असू शकतो. वेदनाशामक औषधे तात्पुरती अस्वस्थता कमी करू शकतात. परंतु ते मूळ कारण कमी करत नाहीत. अशा प्रकरणांमध्ये योग्य वैद्यकीय मूल्यांकन अतिशय महत्त्वाचे आहे. निरोगी जीवनशैली बाळगणे आणि जीवनशैलीत आवश्यक बदल करणे याकडेही लक्ष ठेवायला हवे, जसे की तणाव पातळीचे व्यवस्थापन आणि संतुलित आहार घेऊन आजारावर नियंत्रित मिळवणे शक्य आहे.




## नको मोबाईल गेम्सचं व्यसन

मुलांच्या सुट्टीचा काळ सुरू झाला आहे. सध्या पौंगडावस्थेतील मुलामुलींबरोबर तरुण आणि प्रौढांमध्येही मोबाईल गेम्सचे फॅड वाढत आहे. ते तासनतास मोबाईल किंवा व्हिडिओ गेम खेळण्यात घालवतात. सुट्टीच्या काळात हा नाद आणखी वाढतो. बघताबघता ही सवय व्यसनात परावर्तित होते. अर्थातच अल्पावधीत याचे दुष्परिणाम समोर येतात. शारीरिक हालचाल कमी होते. अधिक काळपर्यंत स्क्रीनला चिकटून राहणं शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यासाठीही चांगलं नसतं. सतत बसून राहिल्याने स्थूलपणा वाढतो. स्थूलपणामुळे पुढे विविध विकारांना निमंत्रण मिळू शकतं.

एकूणच सतत गेम खेळत रहाणं ही वाटते तितकी साधी समस्या नाही. हिंसक गेम्स खेळत राहिल्यामुळे झोपेचं चक्र बिघडतंच शिवाय मज्जासंस्थेच्या समस्या निर्माण होतात. सतत गेम्स खेळत राहिल्यामुळे शारीरिक हालचाल होत नाही. इतर छंदांना वेळ देता येत नाही. कोणत्याही सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला वेळ नसतो. याचा पुढे प्रचंड ताण येतो. शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडू शकतं. बैठ्या जीवनशैलीची सवय होऊ लागते. शारीरिक मेहनतीची कामं जमत नाहीत. प्राधान्यक्रम ठरवता येत नाहीत. एकटेपणा वाढतो. आयुष्यात कोणतंही ध्येय नसल्यासारखं वाटू लागतं. नकारात्मक भावना वाढीस लागतात.

गेमिंगच्या व्यसनाचे असे असंख्य दुष्परिणाम दिसू लागतात. म्हणूनच मोबाईल गेम खेळण्यावर नियंत्रण ठेवायला हवं. मुळात लहान वयात मोबाईलची सवय लावू नये. मूल रडू लागल्यावर पालक मोबाईल हातात देतात. पण ही कृती पुढे त्रासदायक ठरू शकते. मुलांना मोबाईल तसंच गेम्सपासून लांब ठेवणं खूपच कठीण आहे. मुलांच्या गेम खेळण्यावर पूर्णपणे बंदी आणता येणार नाही पण त्यावर नियंत्रण नक्कीच आणता येईल. मुलांना ठराविक वेळ ठरवून द्या.



आरोग्य व्यवस्थापन
**डॉ. तुषार गलांडे**

## मलप्रत्यारोपण शस्त्रक्रिया का गरजेच्या?

आतड्यांशी आरोग्याचा थेट संबंध असतो. यामधील कोणत्याही प्रकारची समस्या संपूर्ण आरोग्यावर दुष्परिणाम करू शकते. तेव्हा मलप्रत्यारोपण आतड्यांच्या उपचाराशी संबंधित आहे. याला 'फेकल ट्रान्सप्लांट' किंवा 'फेकल मायक्रोबायोटा ट्रान्सप्लांट' असेही म्हणतात. खरे तर हे 'स्टूल ट्रान्सप्लांट' असून आजकाल त्याची बरीच चर्चा आहे. अनेकांना हे ऐकायला विचित्र वाटते, पण ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे.



या वैद्यकीय प्रक्रियेद्वारे निरोगी व्यक्तीच्या स्टूलमधील बॅक्टेरिया आजारी व्यक्तीच्या आतड्यांमध्ये प्रवेश करतात. आतडे मायक्रोबायोमने संतुलित करणे आणि पाचक प्रणाली निरोगी करणे हा त्यामागील उद्देश असतो. या प्रक्रियेत निरोगी दात्याकडून 'स्टूल' घेतले जाते, ते फिल्टर केले जाते आणि द्रव स्वरूपात काही प्रक्रिया केली जाते. नंतर कोलोनोस्कोपी, एनिमा, कॅप्सूल किंवा अनुनासिक ट्यूबद्वारे ते रुग्णाच्या आतड्यांमध्ये इंजेक्शन दिले जाते.

आरोग्यभान
**डॉ.अजेय गर्जे**

**स्टूल प्रत्यारोपण कोणत्या रोगांमध्ये प्रभावी?**

विष्ठा प्रत्यारोपण विशेषतः क्लॉस्ट्रिडियम डिफिसाइल संसर्गावर उपचार करण्यासाठी केला जातो. हा आतड्यांतील एक धोकादायक जिवाणू संसर्ग आहे. याशिवाय अनेक आजार बरे करण्यासाठीही या पद्धतीचा उपयोग होतो.

* आयबीएस (इरिटेबल बोवेल सिंड्रोम). यामध्ये पोटदुखी, सूज आणि खराब पचन अशा तक्रारी असतात.

* अल्सरेटिव्ह कोलायटिस आणि क्रॉन्स डिसीज हे दोन्ही आजार आतड्यांच्या जळजळीशी संबंधित आहेत.

* ऑटिझम आणि न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरमध्येही याची मदत घेतली जाऊ शकते. काही संशोधनानुसार, स्टूल ट्रान्सप्लांट ऑटिझमशी संबंधित पचनसमस्या कमी करू शकते.

* ही प्रक्रिया लठ्ठपणा आणि चयापचय विकारांमध्येदेखील फायदेशीर ठरू शकते कारण आतड्यांतील बॅक्टेरियाचे असंतुलनही वजन प्रभावित करू शकते.

**स्टूल प्रत्यारोपण जीव वाचवू शकते?**

अभ्यासानुसार, 'क्लॉस्ट्रिडियम डिफिसिल' संसर्गाने ग्रस्त ९० टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णांना स्टूल प्रत्यारोपणाने आराम मिळतो. अँटीबायोटिक्स प्रभावी ठरत नसणाऱ्यांसाठी हे जीवन वाचवणारे ठरू शकते. मात्र या तंत्रज्ञानाचा इतर आजारांवर कसा परिणाम होतो, यावर अजूनही संशोधन सुरू आहे. त्यामुळेच येत्या काळात पचनसंस्था आणि रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित आजारांवर हा एक क्रांतिकारक उपचार ठरू शकतो, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे.

## महिलांना जास्त झोप हवी

मानवी शरीर कोणत्याही बाह्य मदतीशिवाय अंतर्गत दोष दुरुस्त करण्याचे काम करत असते. यासाठीचे बरेच काम झोपेदरम्यान होते कारण तेव्हा हार्मोन्स सर्वाधिक सक्रिय असतात. त्यामुळेच मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या निरोगी राहण्यासाठी पुरेशी झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु सध्या अनेकजण फोनवर आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ घालवताना दिसतात. अशांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. तज्ज्ञांच्या मते, पुरुषांपेक्षा महिलांना जास्त झोप गरजेची असते.

काही वर्षांपूर्वी 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये 'अ सोसायटी फॉर वुमेन्स हेल्थ रिसर्च' अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यात महिला आणि पुरुषांना आवश्यक असणारे झोपेचे तास वेगवेगळे असल्याचे सांगण्यात आले. 'नॅशनल स्लीप फाऊंडेशन' (एनएसएफ) आणि 'ड्यूक युनिव्हर्सिटी'च्या अभ्यासानुसारही महिला दिवसभर पुरुषांपेक्षा जास्त मानसिक ऊर्जा खर्च करतात. त्यामुळे त्यांच्या मेंदूला अधिक झोपेची आवश्यकता असते.

आरोग्यविशेष
**डॉ. कुंदन गायकवाड**

**महिलांना का हवी जास्त झोप?**

महिलांचा मेंदू अधिक गुंतागुंतीचा असून त्यात एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता असते. याचा अर्थ असा, की महिलांचा मेंदू अधिक कठोरपणे काम करतो. त्याचमुळेच त्यांना अधिक विश्रांतीची आवश्यकता असते.

**महिला आणि पुरुषांच्या झोपेत काय फरक?**

* स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत जास्त गाढ झोपतात. त्यामुळे त्यांचे शरीर आणि मेंदू लवकर रिचार्ज होतो. परंतु त्यांची झोप वारंवार खंडित झाली तर त्रासदायक परिणाम होतो.

* महिलांना सरासरी साडेसात ते नऊ तासांची झोप लागते तर पुरुषांसाठी सात ते आठ तास झोप पुरेशी मानली जाते. याशिवाय महिला 'रेम' (रॅपिड आय मूव्हमेंट) झोप अधिक घेतात, जी स्वप्ने पाहण्यासाठी आणि स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आवश्यक असते.

* पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये निद्रानाशाची समस्या ४० टक्के जास्त आढळते. संप्रेरकांमधील बदल, तणाव, गर्भधारणा आणि मासिक पाळी अशी यामागील कारणे असू शकतात.



## 'फबिंग'मुळे वाढतो दुरावा



सध्या 'फबिंग' हा डेटिंग शब्द इंटरनेटवर वेगाने व्हायरल होत असून तो 'फोन' आणि 'इग्नोरिंग'या दोघांच्या एकत्रिकरणातून बनला आहे. एखादी व्यक्ती जोडीदाराच्या भावनांकडे दुर्लक्ष करून फोनला प्राधान्य देते तेव्हा एकमेकांमध्ये नकारात्मकता निर्माण होते. एकमेकांबरोबर असतानाही जोडीदार स्क्रोल, चॅट करण्यात किंवा सोशल मीडियावर व्यस्त राहतो तेव्हा त्याला 'फबिंग' म्हणतात. आजकाल ही बाब अनेकांना सामान्य वाटत असली तरी यामुळे हळूहळू भावनिक अंतर वाढू शकते आणि जोडीदाराला एकटे वाटू शकते. त्यामुळेच ही समस्या दुर्लक्षित करण्याजोगी नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

**नातेसंबंधांवर 'फबिंग'चे परिणाम**

मानसशास्त्रीयदृष्ट्या बघायचे तर एखादी व्यक्ती फोनमुळे जोडीदाराकडे वारंवार दुर्लक्ष करते तेव्हा दुसऱ्याचा स्वाभिमान दुखावू शकतो. यातून तणाव, संघर्ष निर्माण होतो तसेच नातेसंबंधाची गुणवत्ता घसरू शकते. एका संशोधनानुसार वारंवार 'फबिंग' होत असेल तर संबंधित दोन व्यक्तींमध्ये भांडणे होण्याचे प्रमाण वाढते. अशा नात्यांमध्ये भावनिक ओढ कमी होते आणि कधीकधी ते ब्रेकअप किंवा घटस्फोटापर्यंत देखील पोहोचू शकते.

जीवनशैली
**डॉ. सतीश सोनवणे**

**'फबिंग' टाळण्याचे मार्ग**

* **फोन-फ्री वेळ सेट करा:** जोडीदाराबरोबर क्वॉलिटी टाईम घालवण्यासाठी काही काळ फोन सायलेंट मोडवर ठेवा.


* **संवाद वाढवा:** जोडीदार तुमच्याकडे दुर्लक्ष करत आहे, असे वाटत असेल तर त्यांच्याशी मोकळेपणाने बोला आणि तुम्हाला काय वाटते ते समजावून सांगा.

* **डिजिटल डिटॉक्सचा अवलंब करा:** दररोज फोन बाजूला ठेवून एकमेकांबरोबर काही वेळ घालवा.

* **एकमेकांना प्राधान्य द्या:** नात्यात आदर आणि प्रेम राखणे महत्त्वाचे असते. म्हणूनच फोनपेक्षा समोरच्या व्यक्तीला जास्त महत्त्व द्या.

* 'फबिंग' ही एक धोकादायक सवय बनत चालली असून ती नातेसंबंधांवर परिणाम करत आहे. हे वेळीच थांबवले नाही तर नाते कमकुवत होऊ शकते. म्हणूनच स्मार्टफोनपेक्षा जोडीदाराकडे जास्त लक्ष द्या आणि नाते अधिक मजबूत करा.

नवसंशोधन



### केसगळती आणि प्रदूषण

प्रदूषणामुळे केस गळण्याचं प्रमाण वाढू लागलं आहे. महिलाच नाही तर पुरुषांनाही केस गळण्याच्या समस्येने ग्रासलं आहे. प्रदूषित कणांच्या सततच्या संपर्कामुळे केसांच्या वाढीला कारक ठरणाऱ्या प्रथिनांचं प्रमाण घटतं आणि केस गळू लागतात. दक्षिण कोरियातल्या एका कंपनीने केलेल्या एका अभ्यासातून ही बाब समोर आली आहे. या अभ्यासातून केस गळणं आणि प्रदूषण यांचा संबंध दर्शवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. म्हणूनच शहरी भागातल्या लोकांमध्ये केसगळतीचं प्रमाण वाढल्याचं पहायला मिळतं.

दंतारोग्य

### गैरसमज नको

अनेकजण रूट कॅनाल करून घेतात. या उपचारपद्धतीबाबत काही समज आणि गैरसमज आहेत. रूट कॅनाल ही वेदनादायी प्रक्रिया आहे. त्यामुळे अनेकांना रूट कॅनालची भीती वाटते. मात्र रूट कॅनाल करताना दातांचा काही भाग बधीर केला जातो. यामुळे वेदनांची फारशी जाणीव होत नाही. त्यामुळे रूट कॅनालबाबतचे गैरसमज दूर करून या प्रक्रियेला सामोरं जायला हवं.



डोळ्यांचे आरोग्य

### डोळा फडफडतोय?



डोळा फडफडणं हा अनेकांना अशुभ संकेत वाटतो. पण प्रत्यक्षात डोळा फडफडण्याचा संबंध ताण किंवा शारीरिक व्याधीशी असू शकतो. डोळ्याच्या स्नायूवर ताण आला की तो फडफडू लागतो. डोळ्याचे स्नायू आता थकले आहेत किंवा त्यावर ताण आला आहे हे सांगण्यासाठी शरीर या पद्धतीचा अवलंब करतं. अपुरी झोप, सतत कॉम्प्युटरपुढे बसून रहाणं, मोबाईल फोनचा अतिवापर, कॅफेनचं अतिसेवन यामुळेही डोळा फडफडू शकतो.

आजीबाईचा बटवा

### आल्याचा चहा प्या

आल्याचा चहा औषधी आहे. आल्याचा चहा प्यायल्याने बरेच लाभ होतात. आल्याच्या चहामुळे वजन कमी व्हायला मदत होते. त्यामुळे वजन कमी करणाऱ्यांनी आहारात आल्याच्या चहाचा समावेश करायला हवा. आलं घातलेल्या चहामुळे रक्तातली साखर नियंत्रणात रहाते. शिवाय हा चहा प्यायल्यानंतर पोट बराच काळ भरलेलं रहातं आणि खाण्यावर नियंत्रण रहातं. आल्याच्या चहामुळे पचनशक्ती सुधारते, रोगप्रतिकारशक्ती वाढते. शरीराचा दाह कमी होतो.



# मेळघाटात पाणी पेटले : भीषण पाणीटंचाई

## ७७६ गावात पाण्याचा प्रश्न बिकट
## ७ गावांत टँकरने पाणीपुरवठा सुरू



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २२ :
अमरावती जिल्ह्यातील ७७६ गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. जिल्हा प्रशासनाने जूनपर्यंत पूर्ण करायच्या उपाययोजना सध्या केवळ ५० टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहेत.

चांदुर रेल्वे तालुक्यातील सावंगी आणि मग्रापुर तसेच चिखलदरा तालुक्यातील आकी, खडीमल, मोथा, लवादा आणि तारुबांदा या सात गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

प्रशासनाच्या म्हणण्यानुसार पाच आणि दहा लीटर क्षमतेच्या टँकरमधून दररोज किमान पाच फेऱ्या केल्या जातात. मात्र स्थानिकांच्या म्हणण्यानुसार प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी आहे. मेळघाटमधील चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांमध्ये ३१३ गावे आहेत. काही निवडक गावे वगळता बहुतांश गावांमधील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. येथील बहुतेक गावांमध्ये शासकीय नळ योजना राबवण्यात आली आहे. मात्र या योजनेसाठी खोदलेल्या विहिरींमध्ये पाणीच नसल्याने टँकरने पाणी भरावे लागते.

'खोज' या स्वयंसेवी संस्थेच्या पाहणी दौऱ्यात माडीझडप, माखला, चुनखडी, खडीमल, चौराकुंड, मालूर, खोकमार, भ्रुतृम यांसह सुमारे तीस ते चाळीस गावांमध्ये टँकरही पोहोचू शकत नसल्याचे आढळून आले आहे. तापमानातील वाढीमुळे येत्या काळात ही परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## कोल्हापूर उपसंचालक पदावर प्रवीण टाके यांची पदोन्नती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील ७ वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपसंचालक माहिती म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने आज २२ एप्रिल रोजी या संदभार्तील आदेश काढले आहेत.

यामध्ये नांदेडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांचाही सहभाग असून त्यांची नियुक्ती विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून करण्यात आली आहे.

जिल्हा माहिती अधिकारी या पदावर गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात प्रवीण टाके नांदेड येथे रुजू झाले होते. यापूर्वी त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात रूजू झाल्या नंतर नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी, मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना लोकराज्यचे कार्यकारी संपादक म्हणून तर चंद्रपूर व नागपूर या दोन ठिकाणी जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्य केले आहे .

शासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना व लोकमत या दैनिकांमध्ये पत्रकारिता केली आहे. नांदेडमध्ये वर्षभरात दोन लोकसभा व विधानसभा निवडणूक काळात त्यांनी उत्तम काम केले.

आज सामान्य प्रशासन विभागाने जाहीर केलेल्या पदोन्नतीमध्ये रवी गीते जिल्हा माहिती अधिकारी वर्धा यांना विभागीय माहिती कार्यालय कोकण येथे उपसंचालक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

वरिष्ठ सहाय्यक संचालक देवेंद्र पाटील, प्रतिनियुक्ती वर असलेल्या श्रीमती मीनल शशिकांत जोगळेकर, कीर्ती मोहरील पांडे, वर्षा संतोष आंधळे व किरण जनार्दन मोघे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. तसे आदेश आज मंगळवारी निर्गमित करण्यात आलेत.

## दारूडया मुलाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २२ :
दारू पिऊन आईसोबत वाद घालत मारहाण करणाऱ्या मुलाला सोडवत असताना मुलाने वडिलालाही मारहाण केल्याने वडिलांना स्वतःच्या संरक्षणाकरिता बैलबंडीच्या उधारीने मुलाच्या डोक्यावर प्रहार केला. यामध्ये मुलाचा जागीच मृत्यु झाला.

ही घटना मूल तालुक्यातील येसगाव येथे घडली. चंद्रशेखर नागेंद्र वाढई (३५) असे मृतक मुलाचे नांव आहे. तर नागेंद्र पांडुरंग वाढई (६५) असे आरोपी वडिलाचे नांव असून पोलीसांनी त्यांना अटक केली आहे.

येसगांव येथील नागेंद्र वाढई यांना तिन मुले आहे. एकाचा काही वषार्पुर्वी मृत्यु झाला. एक मुलगा कामानिमीत्य बाहेरगावी राहात आहे. तर चंद्रशेखर हा अविवाहीत होता, तो आपल्या आई-वडीलासोबत राहात होता. चंद्रशेखर व्यसनाधीन होता. दररोज भांडण करीत आई-वडीलांना मारझोड करायचा. आई भेजगांव येथे आठवडी बाजार करून परत आल्यानंतर दारूच्या नशेत अंगणात झोपलेल्या चंद्रशेखरने आईसोबत भांडण करून मारझोडही केली. घर पेटवुन देण्याची धमकीही देत होता. दरम्यान वडील नागेंद्र वाढई आले.

चंद्रशेखरला समजावण्याचा प्रयत्न केला. त्याने वडीलांनाही मारहाण सुरू केली. जीव वाचविण्याच्या प्रयत्नात बैलबंडीच्या उभारीने चंद्रशेखरच्या डोक्यावर प्रहार करताच तो जागीच ठार झाला.

घटनेनंतर आरोपी नागेंद्र वाढई यांनीच पोलीस पाटील राजु कोसरे यांच्याशी संपर्क साधुन घटनेची माहिती दिली. पोलीस उपअधिक्षक तथा मूल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रमोद चौघुले यांच्या मार्गदर्शनखाली नागेंद्र वाढई यांच्यावर मूल पोलीस स्टेशन येथे विविध कलमांवये गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेने दिली १० लाखांत सुपारी

अंकुश कडू हत्याकांड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
भूखंड व्यवसायी अंकुश कडू (५४) यांच्या खुनाचे रहस्य उलगडण्यात अखेर पोलिसांना यश आले. व्यवसायिक प्रतिस्पधेर्तून एका महिलेने त्यांची १० लाख रुपयांत सुपारी दिल्याची खळबळजनक माहिती पुढे आली आहे.

पोलिसांनी गुन्हा नोंदवून सुत्रधार महिलेसह ८ आरोपींना अटक केली आहे. संगीता सहारे (५०) रा. कपिलनगर, राहुल वाघ (३२) रा. कळमना, आकाश सहारे (३४) रा. कपीलनगर, अश्वीन खोळगे (२५) रा. कपीलनगर, राजेश उर्फ राजा उर्फ राजू बोकडे (३०) रा. कळमना, विलास नंदनवार (३९) रा. कळमना, धनंजय उर्फ शिवम उर्फ शुभम काटेकर (१९) रा. कळमना आणि अशोक उर्फ लाला मिश्रा (५५) रा. कपीलनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. चार विधीसंघर्ष बालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

अंकुश भूखंड व्यवसायी होता. त्यांची शेती होती. त्यांनी शेतीवर भूखंड पाडून विक्री केली. ठिकठिकाणी त्यांचे भूखंड होते. त्यांचा व्यवसाय तेजीत होते.

आरोपी संगीता सहारे ही सुद्धा भूखंड व्यवसायी आहे. दोघांचाही एकाच परिसरात व्यवसाय होता. अंकुशचा व्यवसाय तेजीत असल्याने संगीताला अनेक ठिकाणी फटका बसत होता. त्यामुळे संगीताने अंकुशचा काटा काढण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी कळमना येथील रहिवासी आरोपी आकाश आणि राजा या दोघांना हाताशी धरले. त्यांना अंकुशच्या खुनाची दहा लाखांत सुपारी दिली. पंधरा दिवसांपूर्वीच त्यांना ५ लाख रुपये अग्रीमही दिले. रक्कम मिळताच आकाश आणि राजाने इतर आरोपींना गोळा केले. त्यांना हत्येची योजना समजावून सांगितली. काही दिवस त्यांनी अंकुशच्या हालचालीवर लक्ष ठेवले तसेच तो ये-जा करीत असलेल्या मार्गावर पाळत ठेवली.

शनिवार १९ एप्रिलच्या सायंकाळी अंकुश मित्राच्या घरी गेला. मित्रासोबत तासभर गप्पा मारल्या. तो म्हाडा चौक मार्गाने घरी परतेल, अशी आरोपींना खात्री होती. त्यामुळे आकाश आणि राजासह इतरही आरोपी चौकात ठाण मांडून होते. अंकुश सायंकाळी ५.४५ वाजताच्या सुमारास दुचाकीने घरी जात असताना मुख्य आरोपी आकाश आणि राजाने त्यांना रस्त्यातच अडविले.

दुचाकीसह त्यांना खाली पाडताच दबा धरून बसलेले इतरही आरोपी धावत गेले आणि सर्वांनी मिळून मोजता येणार नाही एवढे वार करून एका मिनीटात अंकुशची हत्या केली. या प्रकरणी अंकुशचा मुलगा फियार्दी प्रथमेश कडू (२५) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला. हत्येची संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. त्या आधारावर पोलिसांनी आरोपींची ओळख पटविली. या घटनेचा तपास कपीलनगर पोलिसांसह गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलिस निरीक्षक संदीप बुवा व त्यांचे पथक करीत होते. सर्व मारेकऱ्यांना ठिकठिकाणाहून अटक केली. त्या सर्वांना मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. ही कारवाई पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनात वपोनि संदीप बुवा व त्यांचे पथक, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश आडे व त्यांच्या पथकाने केली.

## चंद्रपूर देशात सर्वाधिक हॉट

तापमान ४५.६ अंश सेल्सियसवर : महाबळेश्वर सर्वात थंड

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २२ :
विदर्भात सूर्य कोपला असून सोमवारी (२१ एप्रिल) देशात चंद्रपूर येथे सर्वाधिक म्हणजे कमाल ४५.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.



चंद्रपूरनंतर ब्रह्मपुरी येथे ४५, अमरावती ४४.६ आणि अकोला येथे ४४.१ अंश सेल्सियस तापमानाची नोंदवण्यात आले.

दरम्यान, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात मंगळवारी (२२ एप्रिल) तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भ, कोकणात पुढील तीन दिवसांत कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सियस तापमान वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानंतर हळूहळू उष्ण तापमानात घट होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

गडचिरोली ४३, वर्धा ४३.४, यवतमाळ ४३.४, नागपूर ४३.६, वाशिम ४२.५, गोंदिया ४२.१ व बुलडाणा येथे ३९.८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. येणाऱ्या दिवसात पारा सतत चढता राहणार असून विदर्भात उष्णतेची लाट राहील, असा इशारा प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. उन्हाची तीव्रता पाहता नागपुरातील १३ चौकांतील सिग्नल दुपारी १ ते ४ या वेळेत रेड ब्लिंकवर ठेवले गेले. या वेळेत नागरिकांना या १३ चौकांत थांबावे लागणार नाही.

विदर्भाच्या सर्वच जिल्ह्यात पारा भडकला असून, सकाळपासूनच रस्ते निर्मनुष्य होवू लागले आहेत.


: चलती का नाम गाडी :

## मॅटर एरा नम्मा बेंगळुरूमध्ये लाँच

भारतातील अग्रगण्य टेक इनोव्हेशन कंपनी मॅटर ने भारताच्या इनोव्हेशन कॅपिटल, बेंगळुरूच्या मध्यभागी त्यांची प्रमुख इलेक्ट्रिक मोटरसायकल एरा अधिकृतपणे लाँच केली आहे. हे मॅटरच्या जागतिक दर्जाच्या मॅन्युफॅक्चरिंग हबच्या यशस्वी उद्घाटनानंतर आहे आणि संपूर्ण भारतात त्याच्या वचनबद्ध बाजारपेठ विस्तार आणि गतिशीलता परिवर्तनाची सुरुवात आहे.

मॅटर एरा आता १.८८ लाखांपासून सुरू होणाऱ्या पूर्व-नोंदणी शोरूम किमतीत उपलब्ध आहे. मर्यादित काळासाठी लाँच ऑफर म्हणून, बेंगळुरूमधील पहिल्या ५०० रायडर्सना १.७९ लाखांपासून सुरू होणाऱ्या विशेष किमतीत एरा घेता येईल, ज्यामध्ये १५,००० रूपये किमतीची मोफत आजीवन बॅटरी वॉरंटी मिळेल.

मॅटरच्या ब्रँडला लोकांच्या जवळ आणण्यासाठी, मॅटर लवकरच BTM लेआउटमध्ये पहिला एक्सपिरीयन्स हब - वैश्य बँक कॉलनीजवळील दुसरा टप्पा, १०० फूट रोड येथे अनावरण करणार आहे. या उत्साही जागेमुळे रायडर्सना एरा प्रत्यक्ष अनुभवता येईल, टेस्ट राईड्स घेता येतील आणि मॅटरचे तत्वज्ञान प्रत्यक्ष अनुभवता येईल.




लोकमानस

या प्रवासाचे नेतृत्व करण्यासाठी बेंगळुरूपेक्षा चांगले शहर दुसरे नाही - जिथे नावीन्य ही केवळ एक कल्पना नाही, ती एक जीवनशैली आहे. येथील प्रत्येक लेन, प्रत्येक रायडर उद्देश आणि प्रगतीचा मंत्र जपतो.

एरा ही फक्त एक बाईक नाही - ती २२ व्या शतकातील मोटारसायकल आहे. ती रॉकेटचा थरार आणि तुमच्या खिशात आवडणारी व्यावहारिकता देते, असे मॅटरचे संस्थापक आणि ग्रुप सीईओ मोहल लालभाई यांनी यावेळी सांगितले. ■ ■ ■


: वाद संवाद :

### महिला मृत्यू प्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई व्हावी का?

**डॉ. सुधीर पाटणकर**
**सहायक अधिवक्ता डी. वाय. पाटील रुग्णालय**

○ पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलने उपचारार्थ आलेल्या एका गरोदर स्त्रीला पैशाअभावी उपचार नाकारले आणि तिचा मृत्यू झाला हि अत्यंत दुदैवी आणि तितकीच डॉकटरकीच्या पेशाला काळिमा फासणारी अशी घटना आहे.

सर्वसामान्य रुग्णाला १० लाख रुपये अनामत रक्कम म्हणून भरणे केवळ अशक्यप्राय बाब आहे. परंतु अशा वेळी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या विश्वस्तांनी माणुसकी दाखवून त्या महिलेवर किमान खर्चात उपचार करायला हवे होते असे वाटते. त्यामुळे त्या महिलेला आणि तिच्या बाळाला दोघांना वाचवता आले असते. परंतु या रुग्णालयाने आपण केवळ श्रीमंतांच्या सेवेसाठी तत्पर आहोत गोरगरिबांना इथे उपचार मिळणार नाहीत हेच दर्शवून दिले. म्हणूनच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर सरकारने कडक कारवाई करून या रुग्णालयाचा परवानाच रद्द करायला हवा.

**मीनल साने, समाजसेविका**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालया सारखी धर्मादाय रुग्णालय सरकारकडून अनेक सवलती मिळवतात. परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ मात्र गोरगरीब रुग्णांना मिळत नाही. या रुग्णालयाचा उद्देश हा केवळ व्यावसायिक हेतूने रुग्णाकडून भरमसाठ पैसे लुटणे हाच असावा असे यांचे वागणे आहे. या रुग्णालयाने केवळ पैशासाठी एका गरीब महिलेचा जीव घेतला हे अत्यंत घृणास्पद आणि तितकेच निंदनीय आहे. या रुग्णालयाला सरकारने कडक कारवाई अंतर्गत दंड करायला हवाच शिवाय मृत पावलेल्या महिलेच्या कुटुंबियांना देखील या रुग्णालयामार्फत भरपूर दंड आकारून मदत केली जावी असे वाटते. आश्चर्याची बाब म्हणजे या प्रकरणाला आता एक महिना झाला तरी या रुग्णालयाचे विश्वस्त मंगेशकर कुटुंबीय काहीही बोलायला तयार नाहीत हे आणखी लज्जास्पद आणि निषेधार्ह आहे. ■ ■

### बडीशेपचे औषधी गुणधर्म

बडीशेप थंड असते, त्यामुळे उन्हाळ्यात बडीशेपचे सेवन करणे शरीरासाठी फायदेशीर ठरते. बडीशेपचे सेवन केल्याने शरीराला थंडावा मिळतो आणि पोटाची उष्णताही शांत होते.

बडीशेप सामान्यतः मसाला म्हणून वापरली जाते. त्याचबरोबर बडीशेप अन्न पचविण्यास तसेच अनेक समस्या दूर करण्यास मदत करते. बडीशेपमध्ये जीवनसत्त्वे, कॅल्शियम, फायबर आणि मॅग्नेशियम सारखे घटक असतात. त्याचबरोबर बडीशेप थंड असते, त्यामुळे उन्हाळ्यात बडीशेपचे सेवन करणे शरीरासाठी फायदेशीर ठरते.

बडीशेपचे सेवन केल्याने शरीराला थंडावा मिळतो आणि पोटाची उष्णताही शांत होते.उन्हाळ्यात सेवन केल्यास त्याची चव थंड असल्याने शरीर थंड होते. त्यामुळे जर तुम्हाला पोटाच्या उष्णतेचा त्रास होत असेल तर बडीशेपचे सेवन सुरू करा. त्याचबरोबर दररोज बडीशेपचे सेवन केल्यास शरीर डिटॉक्स होते आणि रक्त स्वच्छ राहते.

उन्हाळ्यात अनेकदा पचनाच्या समस्या उद्भवतात. अशावेळी जर तुम्ही बडीशेपचे सेवन केले तर ते तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. यामध्ये असलेले फायबर तुमची पचनसंस्था मजबूत करण्याचे काम करते. त्याचबरोबर याचे सेवन केल्याने पचनही योग्य होते. त्यामुळे तुम्ही दररोज याचे सेवन करू शकता.वजन कमी करायचं असेल तर बडीशेपचं सेवन करायला हवं. बडीशेप आपली पचनक्रिया सुधारण्यास तसेच चयापचय वाढविण्यासाठी उपयुक्त आहे.बडीशेपमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. याच्या सेवनाने रोगप्रतिकारशक्ती वाढते. याशिवाय शरीराला आजारांशी लढण्याची ऊर्जा मिळते. ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## राज ठाकरेंना साद

उबाठाचे अस्तित्व संपल्यानेच

संजय निरुपम यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
शिवसेना (शिंदे गट) उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी उद्धव ठाकरे गटासह खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

उबाठा गटाचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आल्याने त्यांना आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची गरज भासत आहे, अशी टीका निरुपम यांनी केली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी उबाठा गटाने यापूर्वी मनसे आणि राज ठाकरे यांच्यावर केलेल्या टीकेचा पाढा वाचला.

निरुपम म्हणाले, राऊतांनी कोविड काळात खिचडी घोटाळा केला, गोरेगावात मराठी माणसांना बेघर करून बिल्डर बनून घोटाळे केले. राऊत तुरुंगात गेले. त्यांची ओळख शरद पवार आणि काँग्रेसचे दलाल आणि घोटाळेबाज अशी आहे. त्यांनीच शिवसेना संपवली, पक्ष संपल्याने ते राज ठाकरे यांना साद घालत आहेत.

## काँग्रेस आणि शरद पवारांची भूमिका तळ्यात मळ्यात

अॅड. वामनराव चटप यांचा आरोप : महाराष्ट्र दिनी काळा दिवस

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २२ :
येत्या १ मे रोजी अर्थात महाराष्ट्र दिनी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्यावतीने काळा दिवस पाळण्यात येणार आहे. या दिवशी विदर्भातील सर्व जिल्ह्यात व तालुकस्थळी धरणे आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात येणार आहे.

विदर्भ राज्य आंदोलन समितीचे सर्वेसर्वा अॅड. वामनराव चटप यांनी ही माहिती दिली. तसेच आंदोलनाच्या विस्तारसाठी आणि व्यापक जनजागृतीच्या उद्देशाने येत्या २५ मे रोजी अमरावती येथे पश्चिम विदर्भस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी दीर्घ संघर्ष करणारे अॅड. वामनराव चटप यांनी बुलढाणा येथे प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधला. यावेळी त्यांनी वरील घोषणावजा माहिती दिली. याप्रसंगी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या महिला आघाडीच्या राज्य अध्यक्ष रंजना मामर्डे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष राम बारोटे, जिल्हा समन्वयक दामोदर शर्मा, तेजराव मुंडे, युवा आघाडीचे शरद पोफळे, सामाजिक कार्यकर्ते रामदास शिंगणे, उपाध्यक्ष सिद्धार्थ हिवाळे, सुखदेव नरोटे, अॅड. सुभाष वीणकर, प्रकाश घुबे, प्रा. अनिल रिंढे, प्रा. पी आर राजपूत उपस्थित होते.

अॅड. वामनराव चटप यांनी विदर्भ राज्य, नागपूर करार, संयुक्त महाराष्ट्र, विदर्भाचे झालेले सर्वकश नुकसान, याचा धावता आढावा घेतला. समितीच्या आंदोलनाला जनाधार नसल्याचा अरोप फेटाळून लावतानाच तीव्र आंदोलनाची फारसी आवश्यकता नसल्याचा युक्तिवाद अॅड. वामनराव चटप यांनी केला. स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी गेल्या अनेक दशकांपासून आंदोलन करण्यात येत आहे.

अलीकडच्या काळातील छत्तीसगड, उत्तराखंड, आदि नवनिर्मित राज्यासाठी आंदोलने झाली नाहीत. त्यासाठी कुणी मागणीही केली नाही. मात्र मोठा विस्तार लक्षात घेऊन जनतेच्या सुविधेसाठी, अविकसित भागाचा विकास करण्यासाठी राज्य निर्मिती करण्यात आली. सरकारने ठरवलं तर राज्य निर्मिती सहज शक्य आहे, असे ते म्हणाले.

विदर्भ राज्याच्या निर्मितीचे आश्वासने देऊन, ठराव घेऊन सत्तेत आलेल्या भाजपाने नंतर विदर्भ राज्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. काँग्रेस व शरद पवार यांची भूमिका तळ्यात मळ्यात अशीच राहिल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

## दोन अपघातात दोन ठार

दोन जण गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
बोरवेल खोदण्यासाठी जाणाऱ्या ट्रकवरील चालकाचे वळणावर नियंत्रण सुटून अचानक उलटला. या अपघातात एक ठार तर दोन जण जखमी झाले.



हा अपघात मंगळवारी सकाळी उमरेड पोलीस ठाण्याअंतर्गत मोहपा गावात झाला. जिरकू बाबुलाल सेलुकर (२३),रा.सिमालपुरा ता. शहापूर. जि. बैतूल, मध्यप्रदेश असे अपघातात ठार झालेल्या मजुराचे नाव आहे. तर राजन उर्फ दादू बैगा (चौपाल ता. जि. सिध्दी) आणि जारकू उर्फ सम्मू धन्नू उईके अशी जखमींची नावे आहेत. कळमेश्वर पोलिसांनी आरोपी ट्रकचालक विजयपाल उईके (३३), रा. पवार झेंडा, ता. शहापूर, जि. बैतूल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दुसरा अपघात बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल. महामार्गावर झाडांना पाणी देणाऱ्या टॅंकरवर दुधाची वाहतूक करणारी गाडी धडकल्याने चालकाचा मृत्यू झाला. प्रमोद मंसाराम नंदेश्वर (४२, सतीनगर, पारडी) असे मृत चालकाचे नाव आहे. नंदेश्वर मुळचे गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनीतील रहिवासी होते व कल्याणी ट्रान्सपोर्टमध्ये दुधाची वाहतूक करणारे वाहन चालवायचे. ते आयशर वाहनाने मजूर प्रमोद सावरकर (हसनबाग) याच्यासोबत जात होते. पांजरा टोल नाक्यासमोर सिंग ढाब्याजवळ टॅंकर उभा होता.

त्या टँकरमधून रस्त्यावरील झाडांना पाणी टाकण्याचे काम सुरू होते. चालकाने टॅंकर सुरक्षेची कुठलाही उपाययोजना न करता तसेच कोणताही फलक न लावता उभा केला होता. नंदेश्वर यांना टॅंकर उभा असल्याचा अंदाज न आल्याने त्याला धडक दिली.

त्यात नंदेश्वर व सावरकर हे दोघेही जखमी झाले. धडक जोरात झाली असल्याने टॅंकर व दुधाचे वाहन एकमेकांत फसले होते. त्यांना क्रेनच्या सहाय्याने काढावे लागले. त्यानंतर जखमींना मेडिकल रुग्णालयात नेले असता नंदेश्वर यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. सागर चौधरी यांच्या तक्रारीवरून बेलतरोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.